NATIONAL HEALTH MISSION, MAHARASHTRA

NHM

राष्ट्रीय आरोग्य अभियान
महाराष्ट्र

ग्राम आरोग्य, पोषण पाणी पुरवठा व स्वच्छता समिती



राज्य आरोग्य सोसायटी, मुंबई

अनुक्रमणिका

प्रकरण क्रमांक	विषय	पान क्रमांक
प्रकरण १	लोकसहभाग आणि ग्राम आरोग्य, पोषण पाणी पुरवठा व स्वच्छता समितीची गरज	२–१३
प्रकरण २	ग्राम आरोग्य, पोषण पाणी पुरवठा व स्वच्छता समितीची रचना	१४–२५
प्रकरण ३	ग्राम आरोग्य, पोषण पाणी पुरवठा व स्वच्छता समितीची कार्ये व जबाबदाऱ्या	२६–४३
प्रकरण ४	वार्षिक ग्राम आरोग्य आराखडा	४४–४७

प्रकरण १ ले

लोकसहभागाचे महत्व व ग्राम आरोग्य, पोषण पाणी पुरवठा व स्वच्छता समितीची गरज

१.१ ग्राम आरोग्य, पोषण पाणी पुरवठा व स्वच्छता समितीची गरज :-

आरोग्यसेवा संदर्भात सर्व स्तरावर लोकसहभाग वाढविण्यासाठी राष्ट्रीय आरोग्य अभियान अंतर्गत ग्राम आरोग्य पोषण पाणी पुरवठा व स्वच्छता समितीची रचना व सुरुवात केली गेली. समितीमधील लोकसहभाग वेगवेगळया पातळयांवरचा गृहीत धरण्यात आलेला असून आरोग्य सेवांना निरनिराळया प्रकारचा हातभार किंवा पाठिंबा देणे, आरोग्य सेवा राबविण्यात सहभागी होणे आणि आरोग्य कार्यक्रम/योजनांवर देखरेख व त्यासंदर्भात सेवांचे नियोजन इथपर्यंत हा सहभाग अपेक्षित आहे.

१.२ ग्राम आरोग्य, पोषण पाणी पुरवठा व स्वच्छता समितीची उद्‌दिष्टे :-

१) शासनाच्या निरनिराळया आरोग्य कार्यक्रमांची व योजनांची माहिती लोकांपर्यंत पोहचविणे.

२) आरोग्य योजना व कार्यक्रमांची अंमलबजावणी व नियोजनासाठी लोकांना सक्षम करणे व लोकसहभाग वाढविणे. यामुळे गावातील लोकांचा आरोग्यस्तर सुधारण्यास मदत होईल.

३) आरोग्यावर प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्षपणे परिणाम करणाऱ्या सामाजिक घटकांवर तसेच इतर सार्वजनिक सेवांवर योग्य ती कार्यवाही करणे.

४) लोकांना त्यांच्या आरोग्यविषयक गरजा, अनुभव तसेच आरोग्यसेवा घेण्यासंदर्भातील मुद्यांबाबत बोलतं करणे. लोकांनी आपल्या आरोग्यविषयक गरजा, प्रश्नांबाबत मांडणी केल्यास स्थानिक शासनव्यवस्था आणि सार्वजनिक आरोग्य सेवा त्यांची दखल घेवून योग्य ती कार्यवाही करणे.

५) ग्रामपंचायतींना आरोग्य तसेच इतर सार्वजनिक सेवांबाबत त्यांची असलेली भूमिका व जबाबदाऱ्या अधिक स्पष्ट करण्यासाठी ग्राम आरोग्य, पोषण पाणी पुरवठा व स्वच्छता समितीने मदत करावी. तसेच गावाचा सर्वांगीण आरोग्यस्तर उंचावण्यासाठी या समितीव्दारे नेतृत्व मिळवून दयावे.

६) ग्रामपातळीवर काम करणाऱ्या अंगणवाडी कार्यकर्ती, आरोग्य सेवक/ सेविका तसेच आशा कार्यकर्ती यांना त्यांच्या कामा संदर्भात मदत व सहकार्य करणे.

१.३ <u>आरोग्य म्हणजे काय? तसेच त्यास कारणीभूत घटक कोणते?</u>

अ) आपण साधारणपणे आरोग्याचा संबंध हा आजारपण, डॉक्टर आणि औषधे यांच्याशी लावतो. खरंतर चांगले आरोग्य म्हणजे नुसता रोगांचा अभाव नसून शारिरिक, मानसिक व सामाजिक सुस्वास्थाशी संबंधित आहे.

ब) चांगल्या आरोग्याशी संबंधित महत्वाचे घटक –

- पुरेसे पौष्टिक अन्न (पोषण)
- शुध्द पाणी, स्वच्छ आणि सुरक्षित निवारा
- स्वच्छ परिसर आणि आरोग्यदायी जीवनमान
- चांगल्या आरोग्यसेवा मिळण्याची सोई व सुविधा
- शिक्षण
- सामाजिक सुरक्षितता आणि कामाचा योग्य व समान मोबदला
- पिळवणूक व भेदभावाच्या वागणूकीपासून मुक्तता
- माहितीचा हक्क
- काम करण्यात येणा–या वातावरणाच्या ठिकाणची सुरक्षितता
- तणावरहीत, सौदाहर्य व मैत्रीपूर्ण संबंध

क) आजारपण/ अनारोग्याशी संबंधित महत्वाचे घटक –

- कुपोषण
- अशुध्द पाणी आणि अस्वच्छता
- अनारोग्यदायी राहण्याची परिस्थिती व जीवनमान
- अनारोग्यदायी सवयी – दारु पिणे / इतर नशा करणे.
- अतिकष्टाची कामे व अवघड परिस्थितीत कामे करण्याची स्थिती
- मानसिक ताण
- पुरुषप्रधानता
- आरोग्यसेवा घेण्यात येणाऱ्या अडचणी
- आरोग्यशिक्षणाचा अभाव

१) कुपोषण हे अनारोग्याचे महत्वाचे कारण आहे–

- रोगांना प्रतिकार करण्याची क्षमता कुपोषित माणसांमध्ये कमी असल्याने ती लवकर तसेच अधिक काळ आजारी पडतात.

- हगवण, गोवर, हिवताप आणि न्युमोनिया यासांरख्या आजारांमुळे देखील कुपोषित व्यक्ती दगावू शकते.
- आपल्याकडील जवळपास ५०% जनता ही गरीब असून त्यांना त्यांच्या आयुष्यात अनेकदा निरनिराळया कठीण प्रसंगांना / अवघड परिस्थितींना सामोरे जावे लागते.
- आपल्याकडे महिला व मुलींमध्ये कुपोषणाची समस्या अधिक गंभीर आहे.

कुपोषण – अनारोग्याचे महत्वाचे कारण

↓

उपासमार – कुपोषणाचे महत्वाचे कारण

↓

गरीबी – उपासमारीचे कारण

↓

कुपोषणामुळे व्यक्ती वारंवार आजारी पडते

↓

वारंवार आजारी पडल्याने अधिक कुपोषित होते

↓

आजारपणावरील खर्चामुळे – अधिक गरीबी व अधिक कुपोषण

↓

अधिक आजारपण .... अधिक कुपोषण
हे चक्र असेच चालू रहाते

२) सुरक्षित पाणी आणि सांडपाण्यासाठी योग्य व्यवस्थेचा अभाव –



- असुरक्षित पाणी व पिण्यास अयोग्य पाण्यामुळे अनेक आजार होतात.
- सांडपाण्याच्या योग्य व्यवस्थापनाच्या अभावामुळे पिण्याचे पाणी दुषित होते व पिण्यास असुरक्षित होते.

- शहरी व ग्रामीण दोन्ही ठिकाणी सर्वच रहिवाशांना सुरक्षित पिण्याचे पाणी मिळतेच असे नाही त्यामुळे अधिकाधिक रोग पसरतात.
- हगवण, कॉलरा, काविळ, टायफाईड इत्यादी सारखे आजार असुरक्षित, दूषित पिण्याच्या पाण्यामुळे पसरतात.
- तसेच हिवताप, डेंगी, हत्तीरोग, एनसेफलायटिस इत्यादी सारखे आजार डासांमुळे होतात. हे डासदेखील साचलेल्या डबक्यात, उघडया गटारातचं वाढतात (अंडी घालतात)

३) अनारोग्यदायी राहण्याची परिस्थिती –

अतिगर्दीच्या राहण्याच्या जागा, कोंदट खोल्या, धूर व धुळीने भरलेल्या राहण्याच्या जागा यामुळे श्वसन व श्वसनाशी संबंधित आजार होऊ शकतात तसेच क्षयरोगासारख्या आजारांचाही धोका वाढतो.

४) अनारोग्यदायी सवयी – मद्यपान व इतर व्यसनाधीनता –

जीवनमानाशी संबंधित अनारोग्यदायी सवयी जसे अति मद्यसेवन आणि इतर नशा करण्याच्या पदार्थांचे सेवन अफू, गर्द, गांजा इत्यादीमुळे त्या व्यक्तीचे तसेच कुटुंबाचे ही स्वास्थ बिघडते. यामुळे कौटुंबिक तसेच सामाजिक स्तरावरही अनेक प्रश्न निर्माण होतात.

५) अतिकष्टाची कामे आणि कामाच्या ठिकाणची अवघड परिस्थिती

- अतिकष्टाची कामे उदा. सायकल रिक्षा ओढणे, अवजड सामान वाहून नेणे इत्यादी
- दिवसाचे खूप तास काम करणे.
- कामाच्या ठिकाणच्या अयोग्य परिस्थितीमुळे ही आजारी पडण्याची शक्यता वाढते. उदा. दगडाच्या खाणींमध्ये कुठलीही योग्य ती खबरदारी न घेतल्यास श्वसनाचे आजार उद्‌भवू शकतात.
- कामाच्या ठिकाणी वापरावयाची असुरक्षित साधने व यंत्रे

६) पुरुषप्रधानता –

पुरुष व स्त्रियांच्या आरोग्याची तुलना केली असता आपल्यास असे दिसून येते की, पुरुषांच्या तुलनेत स्त्रिया अधिक आजारी पडतात. यात महत्वाचे कारण म्हणजे स्त्रियांच्या आजाराकडे करण्यात येत असलेले दुर्लक्ष. 'पुरुषप्रधानता' याचा अर्थ असा की, आपल्या समाजात पुरुषांच वर्चस्व असून त्यामुळे स्त्रियांना घरात व समाजात खालचा किंवा कमी दर्जा दिला जातो. हे स्त्रियांच्या अनारोग्याला खालीलप्रमाणे कारणीभूत ठरते –

- आपल्याकडे घरातील स्त्री ही सर्वसाधारणपणे सगळयात शेवटी जेवते व त्यामुळे तिला उरल्यासुरल्या अन्नावर भागवावे लागते अर्थात कमी प्रमाणात अन्न घेतले जाते.
- स्त्रियांना घरची तसेच बाहेरची कामे अशी दोन्ही कामे सांभाळावी लागतात.
- आरोग्यसेवा सुविधा घेण्याची अनास्था स्त्रियांमध्ये जास्त असते.
- शिक्षणासाठीच्या संधीही स्त्रियांना कमी दिल्या जातात.
- लहानपणापासूनच स्त्रियांना निमुटपणे सर्व सोसण्याची सवय लावली जाते.
- स्त्रियांना वारंवार छळ व हिंसेला सामोरे जावे लागते.
- स्त्रीभ्रूण हत्या तसेच हुंडाबळींनाही बळी पडावं लागते.
- अशा सर्व परिस्थितीमुळे स्त्रियांना त्यांच्या आरोग्याला कमी महत्व देण्याची सवय लागते.

७) मानासिक तणाव–

- काहीवेळा आयुष्यात नकारात्मक गोष्टी एवढया वाढतात की, त्यामुळे मानसिक ताण–तणावाला सामोरं जावं लागतं.

- समाजात वा कौटुंबिक पातळीवर तंटे किंवा कुटुंब विभक्त होणे , बेरोजगारी, सामाजिक असुरक्षितता, आराम वा मानसिक शांतता न मिळणे इत्यादी सर्व बाबींमुळे मानसिक तणाव वाढू शकतो.
- आणि अशा तणावामुळेही व्यक्ती आजारी पडू शकते. अशाप्रकारचा ताण हा असहय झाल्यास काही वेळा व्यक्ती आत्महत्येसारख्या टोकाचे पाऊलदेखील उचलू शकतात.

८) आरोग्यसेवा घेण्यात येणाऱ्या अडचणी–

सर्वांना दर्जेदार आरोग्यसेवा देणे ही शासनाची जबाबदारी आहे. परंतू बऱ्याच वेळा लोकांना या आरोग्यसेवा घेताना अनेक अडचणींना सामोरे जावे लागते.

- पुरेसे मनुष्यबळ (डॉक्टर, नर्सेस इत्यादी) उपलब्ध नसल्याने किंवा कामाच्या अतिताणामुळे उपकेंद्र किंवा प्राथमिक आरोग्य केंद्राच्या आवश्यक सेवा उपलब्ध नसणे.
- डॉक्टर्स, नर्सेस तसेच इतर कर्मचाऱ्यांची रुग्णाबरोबरची वागणूक योग्य नसणे, दुर्लक्ष करणे.
- आवश्यक तपासण्यांची सुविधा तसेच औषधे उपलब्ध नसणे.
- अगदी तालूका व जिल्हा रुग्णालयांमध्येही बऱ्याच वेळा पुरेशा सेवा उपलब्ध नसतात.
- अतिदुर्गम भाग, वाहनव्यवस्था नसणे इत्यादी कारणांमुळेही आरोग्य सेवा घेण्यात अडचणी निर्माण होतात.
- अजूनही बऱ्याच ठिकाणी, लोकांना शासकीय रुग्णालयात अथवा दवाखान्यात गेले तरी आपल्या खिशातून काही खर्च करावा लागतो.

९) आरोग्य शिक्षणाचा अभाव–

- आरोग्यसेवांचा वापर वाढविण्यासाठी लोकांना या सेवा कुठे आणि कुठल्या

प्रकारच्या दिल्या जातात तसेच त्यांचे महत्व इत्यादी बाबत माहिती दिली गेली पाहिजे.

- बऱ्याच वेळा लोकांना याबद्दल काहीच माहिती नसते, त्यामुळे ते त्या सेवा गरज असली तरी घेऊ शकत नाहीत.
- यासाठी लोकांमध्ये आरोग्य तसेच आरोग्यसेवांबद्दल जागरुकता असायला हवी. तसेच आरोग्यसेवा देणाऱ्या कर्मचारी, डॉक्टर्स, नर्सेस इत्यादीबरोबर संवादही असायला हवा.

ड)आपली आरोग्य यंत्रणा ज्यावर आधारलेली आहे ती दोन तत्वे –

१) आरोग्य हा आपला मुलभूत मानवी हक्क आहे.

गरीब – श्रीमंत, पुरुष वा स्त्री, तरुण व म्हातारा, कुठल्याही जाती धर्मातील प्रत्येक माणसाला आरोग्यदायी जीवन आणि आरोग्यसेवा मिळण्याचा पूर्ण हक्क आहे.

२) सर्वांना आरोग्य सेवा उपलब्ध करुन देणे ही शासनाची जबाबदारी आहे.

सर्व लोकांना अन्न, शुध्द पिण्याचे पाणी, रोजगार आणि प्राथमिक आरोग्याच्या सेवा उपलब्ध करुन देणे हे शासनाचे कर्तव्य आहे. परंतू हे सर्वांच्या सहकार्याशिवाय शक्य नाही. ''सर्वांसाठी आरोग्य'' साध्य करण्यासाठी सर्वांनी एकत्र येण्याची व मिळून काम करण्याची गरज आहे. हा सर्वांचा हक्क व कर्तव्यच आहे.

आपल्या ग्राम आरोग्य, पोषण पाणी पुरवठा व स्वच्छता समितीव्दारे आपण सर्व एकत्र व मिळून काम करण्याचाच एक प्रयत्न करीत आहोत. या समितीव्दारे गावातील सर्व लोकांना बरोबर घेवून गावाच्या आरोग्य स्थितीत सुधारणा करता येऊ शकेल. यासाठी एक लक्षात घेतले पाहिजे की, आपल्याला सामाजिक, आर्थिक आणि सांस्कृतिक अशा सर्वच घटकांवर काम करावं लागणार आहे.

१.४ राष्ट्रीय आरोग्य अभियान–

सन २००५ मध्ये भारत सरकारने राष्ट्रीय आरोग्य अभियानाची सुरुवात केली. या अभियानाचा मुख्य उद्देश हा ग्रामीण भागातील जनतेला सहज उपलब्ध होतील अशा परवडणाऱ्या आणि दर्जेदार आरोग्य सेवा उपलब्ध करुन देणे असा होता. या अभियानाचे प्रमुख ध्येय हे मातामृत्यू व बालमृत्यू कमी करणे तसेच समाजातील सर्व स्तरावरील विशेषतः वंचित व दुर्लक्षित घटकांना दर्जेदार आरोग्य सेवा उपलब्ध करुन देणे हे होते.

सन २०१३ मध्ये राष्ट्रीय ग्रामीण आरोग्य अभियान व राष्ट्रीय शहरी आरोग्य अभियान यांचे एकत्रिकरण करुन राष्ट्रीय आरोग्य अभियान सुरु करण्यात आले. राष्ट्रीय आरोग्य अभियानचे ध्येय हे आरोग्य संस्थाचे व यंत्रणेचे बळकटीकरण करुन सर्वांना आरोग्यसेवा उपलब्ध करुन देणे हे होय.

खालील आकृतीत गावापातळीवरुन राज्यस्तरापर्यंत आरोग्यासंदर्भात परिणामकारक नियोजन करण्यासाठी वेगवेगळया समित्या / संस्थांची रचना दाखविण्यात आलेली आहे. त्यात दाखविल्याप्रमाणे ग्राम आरोग्य, पोषण पाणी पुरवठा व स्वच्छता समिती ही गावपातळीवरील आरोग्यासंदर्भातील नियोजन व कृती करण्यासाठीची समिती आहे.



१.५ सार्वजनिक आरोग्य सेवा संस्था:-

खालील चित्रात दाखविल्याप्रमाणे शासनामार्फत वेगवेगळया टप्प्यांवर आरोग्यसेवा संस्था उपलब्ध करुन दिलेल्या आहेत.



ग्रामीण भागात ५,००० व आदिवासी भागात ३,००० लोकसंख्येमागे एक याप्रमाणे उपकेंद्र असते. ग्रामीण भागात ३०,००० तर आदिवासी भागात २०,००० लोकसंख्येमागे एक याप्रमाणे प्राथमिक आरोग्य केंद्र असते. त्यानंतर साधारणपणे तालुक्याच्या ठिकाणी ४ ते ५ प्रा.आ. केंद्रांना संदर्भसेवेसाठी म्हणून एक ग्रामीण रुग्णालय असते. याच्यापुढील सेवांसाठी जिल्हा स्तरावर एक जिल्हा रुग्णालय किंवा सामान्य रुग्णालयाची निर्मिती केलेली आहे. या सर्व स्तरांवर प्रतिबंधात्मक व चढत्याक्रमाने उपचारात्मक आरोग्य सेवा मिळतात.

१) पहिला टप्पा- उपकेंद्र

- आवश्यक कर्मचारी - एक स्त्री आरोग्य सेविका, एक पुरुष आरोग्य सेवक व महिला मदतनीस
- उपकेंद्रामार्फत मिळणाऱ्या सेवा -
    - ✓ किरकोळ आजारांवर औषधोपचार,

- ✓ प्रसूतीपुर्व व प्रसूती दरम्यान व पश्चात मिळणाऱ्या सेवा, कुटुंब नियोजनाच्या साधनांचे मोफत वाटप, आठवडयातून एकदा डॉक्टरांची भेट, तपासणी व उपचार,
- ✓ नवजात शिशूची काळजी – लहान मुलांना नियमित लसीकरण, जलसंजीवनी पाकिटांसोबत झिंक गोळयांचे वाटप
- ✓ क्षयरोग, कुष्ठरोग व हिवताप या आजारांची तपासणी व उपचार

- उपलब्ध औषधे – उलटी, सर्दी–ताप, अंगदुखी, जुलाब, संडास साफ न होणे, छातीत जळजळ, पोट जड होणे, पोटदुखी, इ. तक्रांरीवर औषधे, तसेच लोहयुक्त गोळया, हाडांची बळकटी यावर औषधे, बाळंतपणानंतर रक्तस्त्राव लवकर थांबण्यासाठीची औषधे इ. विविध ४४ आवश्यक औषधांचा कायम पुरेसा साठा उपकेंद्रात उपलब्ध असतो.

२) <u>दुसरा टप्पा</u>– प्राथमिक आरोग्य केंद्र

- प्राथमिक आरोग्य केंद्रातील आवश्यक कर्मचारी – मुख्यालयात राहणारे वैद्यकिय अधिकारी, आरोग्य सेवक व सेविका, आरोग्य सहाय्यक (स्त्री/पुरुष), प्रयोगशाळा तंत्रज्ञ, औषध निर्माण अधिकारी, वाहनचालक , शिपाई, सफाई कामगार
- उपलब्ध औषधे :– अत्यावश्यक औषधांच्या सूचीनुसार २५८ औषधांचा कायम व पुरेसा पुरवठा असावा. तसेच गरोदर माता व बालकांच्या लसी, सर्पदंश वरील इंजेक्शन, कुत्रा चावल्यास घ्यावयाची लस, हिवताप, क्षयरोग व कुष्ठरोगावरील औषधे तसेच जुलाब, ताप, खोकला सर्दी यासारख्या किरकोळ आजारांवरील उपचारासाठीची औषधे प्रा.आ.केंद्रात उपलब्ध असतात.
- आवश्यक सुविधा – रुग्णांना दाखल करुन घेण्यासाठी

१) रुग्णभरतीची सोय
२) शस्त्रक्रियागृह
३) प्रसूतीगृह
४) लसी ठेवण्यासाठी विशिष्ट प्रकारचा फ्रिज (ILR/Deep Freezer),
५) २४ तास रुग्णवाहिका सेवा
६) रक्त, लघवी इत्यादी तपासण्यासाठी प्रयोगशाळा

- प्रा.आ. केंद्रात मिळणाऱ्या सेवा
  - ✓ बाहयरुग्ण व आंतररुग्ण विभागाच्या सेवा जसे दररोज सकाळ-संध्याकाळ बाहयरुग्ण सेवा, गंभीर आजारी रुग्णास दाखल करुन घेण्याची सोय व गरोदरमाता व बालके यांचे लसीकरण.
  - ✓ रोगप्रतिबंधक उपाय जसे हिवताप व डेंगी प्रतिबंधक उपाययोजना, पाणी नमुना तपासणी, गप्पीमासे पैदास इ.
  - ✓ सर्पदंश, अपघात इ.साठी २४ तास तातडीची सेवा व वाहनाची सोय
  - ✓ गरोदर स्त्रियांसाठी सेवा – गरोदरपण व बाळंतपणा नंतरच्या तपासण्या, औषधोपचार, बाळंतपण सेवा व सल्ला मार्गदर्शन
  - ✓ संतती नियमनासाठीची मोफत साधने, स्त्री व पुरुष नसबंदी शस्त्रक्रिया व सल्ला – मार्गदर्शन
  - ✓ राष्ट्रीय आरोग्य कार्यक्रमाअंतर्गत सेवा जसे हिवताप, कुष्ठरोग, हत्तीरोग, क्षयरोग, मोतिबिंदू इ. आजारांवर मोफत उपचार देणे.
  - ✓ इतर सेवा जसे गरजेनुसार रक्त, लघवी, थुंकीची साधी तपासणी, प्राथमिक स्वरुपाच्या शस्त्रक्रिया, जखमांना टाके घालणे इ.
  - ✓ कायदा / गुन्हयांशी निगडीत सेवा – बलात्कार, कौटुंबिक मारहाण, खून, अपघात इ. बाबतीत वैद्यकीय तपासणी व प्रमाणपत्र देणे तसेच जन्म सुचना व मृत्यू प्रमाणपत्र देणे, त्याचप्रमाणे नागरी सेवांकरिता जेष्ठ नागरिकांना आवश्यक वयाचा दाखला मोफत देणे.

३) <u>तिसरा टप्पा</u>– ग्रामीण रुग्णालय /उपजिल्हा रुग्णालय व जिल्हा रुग्णालय

– प्रा.आ.केंद्रातील रुग्णांना संदर्भ सेवा देण्याचे काम ग्रामीण रुग्णालय / उपजिल्हा रुग्णालयात होते.

– या अंतर्गत खालील सेवा/व्यवस्था उपलब्ध असतात – नेहमीच्या बाहय रुग्ण सेवा, शस्त्रक्रिया, सिझेरीयन शस्त्रक्रिया त्यासाठी सुसज्ज शस्त्रक्रियागृह, बाळंतपणासाठी प्रसूती कक्षाची व्यवस्था, ३० किंवा त्यापेक्षा अधिक रुग्णांना दाखल करण्याची सोय, क्ष-किरण यंत्र, रक्त, लघवी इ. तपासण्या.

– ग्रामीण रुग्णालयात /उपजिल्हा रुग्णालय या अनुषंगाने लागणारे सर्व आरोग्य कर्मचारी उपलब्ध असतात.

– जिल्हा रुग्णालय हे विशेषज्ञांच्या सेवा मिळण्याचे ठिकाण असून बालरोगतज्ञ, स्त्रीरोगतज्ञ, भुलतज्ञ, नेत्रतज्ञ, शल्यतज्ञ इ.च्या सेवा उपलब्ध असतात. तसेच त्याअनुषंगाने कराव्या लागणाऱ्या तपासण्या जसे रक्तलघवीच्या वेगवेगळया तपासण्या, सोनोग्राफी, क्ष– किरण, रक्तपेढी इ. सोयीही उपलब्ध असतात.

उपलब्ध औषधे :– अत्यावश्यक औषधांच्या सूचीनुसार ५३६ औषधांचा कायम व पुरेसा पुरवठा रुग्णालयात असावा.

प्रकरण २ रे

ग्राम आरोग्य, पोषण पाणी पुरवठा व स्वच्छता समितीची रचना

अ)ग्राम आरोग्य, पोषण पाणी पुरवठा व स्वच्छता समितीचा ग्रामपंचायतीशी असलेला संबंध–

महसुली गावपातळीवर ग्राम आरोग्य, पोषण पाणी पुरवठा व स्वच्छता समितीची रचना केली जाते. पंचायत राज संस्थेच्या कक्षेअंतर्गत ग्राम आरोग्य, पोषण पाणी पुरवठा व स्वच्छता समितीचे काम चालते.

ब)ग्राम आरोग्य, पोषण पाणी पुरवठा व स्वच्छता समिती स्थापन करण्याची प्रक्रिया –

- ग्रामपंचायत सदस्य, अंगणवाडी कार्यकर्ती, एएनएम आणि आशा, आशा गट प्रवर्तक (किंवा तालुका संघटक) हे एकत्रितपणे गावातील लोकांशी चर्चा करुन समितीचे सदस्य निवडतील. सदस्य निवडीमागील तत्वे याच विभागात पुढे दिलेली आहेत.
- अंगणवाडी कार्यकर्ती, एएनएम, आशा आणि आशा गट प्रवर्तक (किंवा तालुका संघटक) मिळून गावात ग्राम आरोग्य, पोषण पाणी पुरवठा व स्वच्छता समितीची भूमिका व रचना याबाबत चर्चा करण्यासाठी बैठक घेतील.
- ग्राम आरोग्य, पोषण पाणी पुरवठा व स्वच्छता समिती ही ग्रामपंचायतीच्या कक्षेत येत असल्यामुळे ग्रामपंचायतीचा कालावधी संपल्यावर ही समितीही बरखास्त करावी. त्यामुळे नवीन ग्रामपंचायत सदस्य निवडून आल्यावर या समितीचीही पुर्नरचना करावी.
- आधीच्या समितीतील उत्साही, कार्यक्षम व कर्तव्य तत्पर सदस्यांची पुर्ननियुक्ती करण्यास हरकत नाही. परंतु जे फारसे कार्यक्षम नव्हते त्यांची १/३ समिती सदस्यांच्या अनुमतीने पुन्हा नेमणूक करु नये.

क)समितीची रचना

१)सदस्य संख्या

ग्राम आरोग्य स्वच्छता व पोषण समितीमध्ये किमान १५ सदस्य संख्या हवी. याहून अधिक सदस्य सुध्दा असू शकतात.

२) सदस्य निवडीबाबतची महत्वाची तत्वे–

१) ग्रामपंचायतीत निवडून आलेले सदस्य विशेषतः महिला सदस्यांना समितीचे नेतृत्व करु द्यावे.

२) गावातील आरोग्य व त्यासंदर्भातील सेवांशी निगडीत काम करणाऱ्यांना समितीत सहभागी होण्याची संधी मिळावी.

३) आरोग्यसेवांचा लाभ घेणाऱ्यांना विशेषतः माता – गरोदर महिला यांना समितीत जरुर स्थान असावे.

४) गावातील सर्व गटांना विशेषतः गरीब आणि वंचित गटांचे प्रतिनिधित्व समितीत जरुर असावे.

५) तसेच सर्व वाडयावस्त्यांचे प्रतिनिधींचा पण समावेश समितीत असावा.

केंद्रशासनाच्या मार्गदर्शक सूचनांप्रमाणे VHNSC समिती मध्ये ५०% महिलांचा समावेश असणे अत्यंत आवश्यक आहे. तसेच समितीचे अध्यक्ष पदी महिला असावी म्हणून ग्रामपंचायत महिला सदस्या यांची अध्यक्ष म्हणून निवड करावी. गावांमध्ये दोन महिला सदस्य असल्यास त्यापैकी एकीची अध्यक्ष म्हणून निवड करावी. जिथे महिला ग्रामपंचायत सदस्य नसल्यास त्या गावामध्ये समितीने गावातील कोणत्याही सक्रिय महिलेची अध्यक्षपदी निवड ग्रामसभेमध्ये करण्यात यावी.

तसेच अनुसूचित जाती जमाती तसेच अल्पसंख्याक गटांचेही पुरेसे नेतृत्व समितीत असले पाहिजे. याच रचनेमध्ये निरनिराळे गट असले तरी त्यातील सदस्य हे एकपेक्षा जास्त गटांचे नेतृत्वही करु शकतात. उदा. लहान मूल असलेली माता ही अगदी दूरच्या वाडीवस्तीतील असू शकते किंवा अनुसूचित जाती जमातीतीलही असू शकते.

वर दिलेल्या तत्वांवर आधारीत या समितीमध्ये खालीलप्रमाणे सदस्य असतील –

१) <u>ग्रामपंचायतीत निवडून आलेली व्यक्ती</u> :–

त्याच गावातील रहिवासी असलेले ग्रामपंचायत सदस्यांची निवड करावी. विशेषतः महिला सदस्यांची निवड करावी. ज्या गावांमध्ये ग्रामपंचायत नाही अशा ठिकाणी आदिवासी कौन्सिल सदस्यांचा विचार करता येऊ शकतो. समिती सदस्य म्हणून एकापेक्षा जास्त ग्रामपंचायत सदस्यांना जरी घेता येत असले तरी ती संख्या समिती सदस्य संख्येच्या १/३ पेक्षा अधिक नको आणि ग्रामपंचायतीच्या सदस्यांना प्राधान्य देण्यात यावे.

२) <u>आशा कायकर्ती</u>:–

गावातील सर्व आशा कार्यकर्तींना या समितीत सदस्य म्हणून घ्यावे. काही लहान गावात एकच आशा नेमलेली असू शकते त्यामुळे अशा गावात समितीत एकच ‘‘आशा’’ असू शकेल.

३) <u>गावापातळीवर काम करणारे आरोग्य कर्मचारी</u> :–

आरोग्य खात्याची एएनएम, एकात्मिक बालविकास योजनेची अंगणवाडी सेविका आणि शाळेतील शिक्षिका यांचा समितीत नियमित सदस्य म्हणून समावेश जरुर करावा परंतू ते त्याच गावातील रहिवासी असावयास हवेत. जर त्याच गावातील रहिवासी नसतील तर त्यांना गरज पडेल तेव्हा बैठकींना विशेष आमंत्रित म्हणून बोलवावे.

गावातील सरकारी खात्यात काम करणारे कर्मचारी / स्वयंसेवक उदा. हातपंप दुरुस्ती करणारे मेकॅनिक किंवा मनरेगा कार्यक्रमाचे समन्वयक यांचाही ते जर त्या गावाचे रहिवासी असल्यास समिती सदस्य म्हणून समावेश करावा.

४) स्वंयेसेवी संस्था :-

गावात काम करणाऱ्या स्वयंसेवी संस्था जसे बचतगट, वन सुरक्षा समिती, तरुण मंडळ, इत्यादीच्या सदस्यांना ही ग्राम आरोग्य पोषण पाणी पुरवठा व स्वच्छता समितीत सहभागी करुन घेता येऊ शकते.

५) गावातील इतर समित्या :-

गावात जर शालेय शिक्षण, पाणी आणि स्वच्छता व पोषण इत्यादीबाबत जर स्वतंत्र समित्या असतील तर पहिले या सर्व समित्यांचे ग्राम आरोग्य, पोषण पाणी पुरवठा व स्वच्छता समिती अंतर्गत एकत्रिकरण केले गेले पाहिजे. हे जर शक्य होत नसेल किंवा ही प्रक्रिया पूर्ण होईपर्यंत हया प्रत्येक समितीतील महत्वाच्या व्यक्तींना ग्राम आरोग्य, पोषण पाणी पुरवठा व स्वच्छता समितीत सदस्य म्हणून समाविष्ट करावे तसेच ग्राम आरोग्य, पोषण पाणी पुरवठा व स्वच्छता समितीच्या अध्यक्षालाही या सर्व समितीचे सदस्यत्व द्यावे.

६) आरोग्य सेवा घेणारे / लाभार्थी :-

गरोदर माता, स्तनदा माता, ३ वर्षापर्यंतची बालके असलेल्या माता आणि जुनाट आजार असलेले रुग्ण जे आरोग्यसेवेचा लाभ घेत आहेत त्यांना ही या समितीत सदस्य म्हणून घ्यावे.

ड) सदस्य निवडीची प्रक्रिया :-

वरील निवडीची तत्वे मध्यवर्ती ठेवून गावातील लोकांनी मिळून सर्व सदस्यांची निवड केली पाहीजे. एएनएम, आशा, अंगणवाडी सेविका आणि ग्रामपंचायत सदस्यांनी मिळून सर्व गटातील लोकांना प्रतिनिधीत्व मिळेल याची खात्री केली पाहिजे. समितीत कमीत कमी ५०% तरी महिला सदस्य असाव्यात आणि अनुसूचित जाती जमाती तसेच अल्पसंख्याक गटाचेही नेतृत्व समितीत असावे.

इ)विशेष निमंत्रित कोण असतील **?**:-

समिती सदस्यां व्यतिरिक्त जे व्यक्ती असतील त्यांना आपण विशेष निमंत्रित या गटात मोडू शकतो. विशेष निमंत्रित व्यक्ती हया समिती बैठकीमध्ये सहभागी होऊ शकतात आणि त्यांची उपस्थिती व इतर सदस्यांबरोबरची चर्चाही गरजेचीच आहे. साधारणपणे या व्यक्ती गावातील रहिवासी नसतील. विशेष निमंत्रितांमध्ये स्थानिक प्राथमिक आरोग्य

केंद्राचे वैद्यकिय अधिकारी, आशा कार्यक्रमाचे गटपर्वतक व पर्यवेक्षक, पंचायत अध्यक्षआणि तालुका विकास अधिकारी, जिल्हा व तालुका पंचायत सदस्य इत्यादींचा समावेश करता येऊ शकतो.

वैद्यकिय अधिकारी आणि तालुका विकास अधिकारी यांनी वर्षातून किमान एक ते दोन बैठकांना अवश्य उपस्थित असावे.

आशा गट प्रवर्तक ज्यांनी इतर गावपातळीवरील प्रक्रिया जसे ग्राम आरोग्य, पोषण पाणी पुरवठा व स्वच्छता समितीसाठीही काम बघणं अपेक्षित आहे. त्यांनीही हया समितीच्या जास्तीत जास्त बैठकींना उपस्थित असावयास हवे.

फ)समितीचा अध्यक्ष कोण असेल **?**

समितीचा अध्यक्ष ही त्या गावाची रहिवासी व ग्रामपंचायतीतील निवडून आलेली महिला सदस्य असू शकते. यातही जर ती महिला अनुसूचित जाती जमातीतील असल्यास प्राधान्य द्यावे. जिथे महिला ग्रामपंचायत सदस्य नसल्यास त्या गावामध्ये समितीने गावातील कोणत्याही सक्रिय महिलेची अध्यक्षपदी निवड ग्रामसभेमध्ये करण्यात यावी.

परंतु सदस्य निवडीचा निर्णय ग्रामपंचायत व ग्राम आरोग्य, पोषण पाणी पुरवठा व स्वच्छता समिती सदस्यांनी मिळून एकमताने घ्यावा.

ग) समितीचा सदस्य– सचिव व संयोजक कोण असेल**?**

ग्राम आरोग्य, पोषण पाणी पुरवठा व स्वच्छता समितीची सदस्य सचिव व संयोजक म्हणून अंगणवाडी कार्यकर्ती असेल.

ह) समिती मध्यस्थ म्हणून आशाचे महत्व :–

१)असे दिसून आले आहे की, आशाला नेतृत्वाची संधी मिळाल्यास, समितीस सूसुत्र मदत यंत्रणा देऊ शकते तसेच समितीची कौशल्य बांधणी ही अधिक चांगल्या रितीनं होऊ शकते.

२) ती लोकांप्रति अधिक उत्तरदायी असते त्यामुळे लोकांकडून देखील आशाचा स्वीकार अधिक चांगल्याप्रकारे होतो. तसेच आशा ही स्थानिक रहिवासी असून आरोग्याबद्दल ती अधिक जाणकार असते.

३) तसेच ती गेल्या काही काळापासून आरोग्यविषयक काम करत असल्याने त्या मुद्यांची तिला अधिक जाण असते.

४) आशाला तिचे काम यशस्वीपणे पार पाडण्यासाठी कार्यक्षम ग्राम आरोग्य, पोषण पाणी पुरवठा व स्वच्छता समितीची गरज लागते. विशेषतः आरोग्याबद्दल जनजागृती करणे, रोगप्रतिबंधक उपाययोजना करणे इत्यादी.

ज) जर गावात एकापेक्षा अधिक आशा कार्यकर्ती असल्यास निवड कशी करावी?

जर गावात एकापेक्षा जास्त आशा कार्यरत असतील तर मध्यस्थ म्हणून सर्वानुमते एकाच आशाची निवड करावी. दोन वर्षांनी आळीपाळीने आशा बदलता येऊ शकते. आशा गटप्रवर्तक (किंवा तालुका संघटक) यांनी ग्रामपंचायत सदस्यांच्या उपस्थितीत सर्व आशांची बैठक घेवून सर्वानुमताने एका आशा कार्यकर्तीची निवड करावी.

संयुक्त बॅंक खाते –

एकदा ग्राम आरोग्य, पोषण पाणी पुरवठा व स्वच्छता समिती स्थापन झाल्यावर जवळच्याच बॅंकेत समितीचे खाते उघडावे. याच बॅंकेत समितीच्या खात्यावर शासनाकडून मिळणारा अबंधित निधी जमा होईल. ग्राम आरोग्य, पोषण पाणी पुरवठा व स्वच्छता समिती अध्यक्ष व सदस्य सचिव (अंगणवाडी कार्यकर्ती) यांच्या दोघांची स्वाक्षरी बॅंक खाते चालविण्यासाठी लागेल.

ग्राम आरोग्य, पोषण पाणी पुरवठा व स्वच्छता समिती खात्याचे व्यवहार हे दोन्ही सदस्यांच्या संयुक्त स्वाक्षरीने (जर खातं उघडतांना दोघांच्या नावे व दोन्ही स्वाक्षरीने चालत असल्यास) करावेत. अबंधित निधीच्या खर्चाबाबत निर्णय हा लेखी स्वरुपात व सर्व समिती सदस्यांच्या स्वाक्षरी घेऊनच घेता येऊ शकतो.

खात्यांच्या व्यवहारासाठी दोन सदस्यांची स्वाक्षरी महत्वाची का ?

खात्याचे व्यवहार जर दोन सदस्यांच्या स्वाक्षरीने होत असतील तर अवैध गोष्टी होण्याचा धोका कमी होऊ शकतो. तसेच यामुळे प्रक्रियेत अधिक पारदर्शकता येऊ शकते.

समितीतील महत्वपूर्ण सदस्यांच्या भूमिका व जबाबदाऱ्या –

१) समितीचा अध्यक्ष –

अ) दर महिन्याला समिती बैठका होतील ही अध्यक्षाची जबाबदारी आहे.

ब) बैठकांचे नेतृत्व करणे व परिणामकारक निर्णय प्रक्रियेसाठी समितीचे कामकाज सफाईने व व्यवस्थित चालेल याची खात्री करणे.

क) ग्रामपंचायतीच्या स्थायी समितीमध्ये आरोग्यसंदर्भात ग्राम आरोग्य पोषण पाणी पुरवठा व स्वच्छता समितीच्या कामकाज तसेच निर्णयाबाबत माहित सांगणे.

ड) ग्राम आरोग्य, पोषण पाणी पुरवठा व स्वच्छता समितीला ग्राम आरोग्य आराखडा तयार करण्यास मदत करणे व त्यासाठी आवश्यक ती कार्यवाही व पाठपुरवठा करण्याची जबाबदारी घेणे.

इ) तसेच समितीला वार्षिक आराखडा तयार करण्यास मदत करणे.

फ) गावपातळीवरील आरोग्यविषयक गरजा,बाबी तसेच त्यांचे नियोजन इत्यादी बाबतची मांडणी ग्रामसभा तसेच ग्रामपंचायत समिती बैठकांमध्ये करणे.

ग) समिती बैठकांचे इतिवृत्तांत व अहवाल व्यवस्थित तयार झाले आहेत तसेच नीट ठेवले आहेत ना याची खात्री करणे.

२) अंगणवाडी सेविका –

अंगणवाडी सेविका ही ग्राम आरोग्य पोषण पाणी पुरवठा व स्वच्छता समितीची सदस्य सचिव आहे. समितीमध्ये कुपोषणावर ठोस उपाययोजना करण्यासाठी तिची महत्वपूर्ण भूमिका आहे.

अ) ६ वर्षाखालील मुलांच्या कुपोषणाच्या स्थितीची वाडीवस्तीनिहाय माहिती अंगणवाडी सेविकेने समिती बैठकीत मांडावी. तसेच अंगणवाडीच्या कामकाजासंदर्भात येणाऱ्या अडचणी तसेच तिची कार्यक्षमता सुधारण्यासाठी काही मदत आवश्यक असल्यास त्याबाबत मांडणी बैठकीत करावी.

ब) पोषणविषयक सेवा आवश्यक असतील अशा वंचित कुटुंबांची नोंद व माहिती अद्ययावत करणे तसेच गावाचा आरोग्यविषयक विकास आराखडा तयार करताना पोषणविषयक बाबींचा समावेश करण्यात मदत करणे.

क) ३ वर्षाखालील मुले, गरोदर / स्तनदा माता व ३ ते ६ वर्षांची मुले यांना देण्यात येणाऱ्या पूरक आहाराबाबतचे उत्तरदायित्व अंगणवाडी सेविकेकडे असेल. तसेच हा आहार उपलब्ध नसल्यास ती बाब समिती समोर मांडेल.

ड) तसेच अंगणवाडीच्या सेवा पुरवितांना जर काही अडचणी येत असतील तर त्याही समिती बैठकीत सांगाव्यात.

इ) अंगणवाडीत मुलांना देण्यात येणारे शिजविलेले अन्न पदार्थ हे मार्गदर्शक सूचनांनुसारच शिजविले गेले आहे ना यासाठी अंगणवाडी सेविका जबाबदार असेल.

फ)अंगणवाडी सेविका VHNSC समितीच्या सदस्यसचिव आहेत, सदस्यसचिव म्हणून करावयाची कामे, योजनांची अमंलबजावणी, प्राप्त निधी व खर्च, समिती सभा व निर्णय इ. बाबी त्यांनी पाहाव्यात.

३) ए.एन.एम. (आरोग्य सेविका)

अ) माता व बाल आरोग्याबाबतच्या सेवा व योजना तसेच इतरही आरोग्यविषयक योजना व सेवांची माहिती समितीला करुन देणे.

ब) वंचित घटकांबद्दलची अधिक माहिती तसेच ज्यांच्यापर्यंत आरोग्यसेवा पोहचविण्यात अडचणी येत आहेत त्यांच्यापर्यंत आरोग्यसेवा पुरविण्यासाठी ग्राम आरोग्य पोषण पाणी पुरवठा व स्वच्छता समितीची मदत घेणे.

क) गावातील वंचित घटक तसेच आरोग्यसेवा पोहोचविण्यात अडचणी येणाऱ्या घटकांना आरोग्य सेवा देण्याबाबतचा कृती आराखडा तयार करण्याच्या प्रक्रियेस चालना देणे व समितीला त्यासाठी मदत करणे.

ड) गावातील मातामृत्यू व बालमृत्यू तसेच त्यांच्या कारणांबद्दलची माहिती ग्राम आरोग्य, पोषण पाणी पुरवठा व स्वच्छता समितीला सांगणे.

इ) गावात आरोग्यसेवा देतांना तिला येणाऱ्या अडचणीबाबत समिती सदस्यांशी बोलणे.

फ) गावात नियमितपणे गाव आरोग्य पोषण दिवसाचे नियोजन तसेच उपकेंद्राचे कामकाज व इतर आरोग्यसेवा देण्याचे काम सुरळीतपणे पार पाडण्याची जबाबदारी एएनएमकडे असेल.

प)एएनएम – एएनएम यांनी क्षेत्र भेटी दरम्यान ग्राम आरोग्य, पोषण पाणी पुरवठा व स्वच्छता समितीचे रेकॉर्ड तपासणे.

४) आशा गटप्रवर्तक :-

ग्राम आरोग्य, पोषण पाणी पुरवठा व स्वच्छता समितीच्या बैठकांना चालना देण्यामध्ये आशा गटप्रवर्तकाची प्रमुख भूमिका आहे. खर्चाचे तपशील, प्रमाणपत्र तसेच इतर रेकॉर्डस् तालुका आरोग्य अधिकाऱ्यांपर्यंत पोहोचविण्याची जबाबदारी आशा गटप्रवर्तकाची असेल.

५) तालूका आरोग्य अधिकारी व वैद्यकिय अधिकारी यांच्या भूमिका –

तालूका आरोग्य अधिकारी व वैद्यकिय अधिकारी यांनी आपल्या अखत्यारितील महसूली गावांमध्ये समिती स्थापनेपासून ते नियमित सभा व निधी खर्च, याबाबत नियमित आढावा घेणे व अंगणवाडी सेविका यांच्या मासिक सभेमध्ये त्यांच्या शंकांचे निरसन करणे, त्यांना मार्गदर्शन करणे आवश्यक आहे. तालूका आरोग्य अधिकारी यांनी गट विकास अधिकारी यांच्या मदतीने अंगणवाडी सेविकांचा सहभाग वाढविण्यास मदत घ्यावी.

- तालुकापातळीवरुन खर्चाचा नियमित आढावा घ्यावा. तसेच तालूका आरोग्य अधिकारी यांनी आपल्या तालुक्यातील सर्व ग्राम आरोग्य, पोषण पाणी पुरवठा व स्वच्छता समितीच्या गुणानुक्रमांक तयार करावे व त्यानुसार ज्या समितीमध्ये मार्गदर्शक सुचनांचा अवलंब होत नसेल / निधी अखर्चित असेल / आशा कार्यकर्ती, एएनएम, अंगणवाडी कार्यकर्ती समिती सदस्य यांबाबत तक्रार असेल तर अशावेळी संबंधित ग्राम आरोग्य, पोषण पाणी पुरवठा व स्वच्छता समितीस त्वरीत भेट आयोजित करावी व पाठपुरावा करावा.
- आरोग्य सहाय्यक यांना ग्राम आरोग्य पोषण दिनादिवशी भेट देण्याचे निर्देश दिलेले आहेत त्याचवेळी आरोग्य सहाय्यक/ आरोग्य सेवक यांनी ग्राम आरोग्य, पोषण पाणी पुरवठा व स्वच्छता समितीला भेट दयावी व त्यांच्या नोंदी तपासाव्यात.याबाबतचा आढावा वैद्यकिय अधिकारी यांनी घ्यावा.
- ग्राम आरोग्य, पोषण पाणी पुरवठा व स्वच्छता समिती यांनी आवश्यकता भासल्यास वैद्यकीय अधिकारी, प्राथमिक आरोग्य केंद्र, यांना त्यांच्या सोईनुसार समिती सभेला बोलवावे. उदा.गावातील समस्या सोडविण्यासाठी, वारंवार पाठपुरावा करुन पूर्तता न झाल्यास, गावातील समारंभ (सत्कार कार्यक्रम / लसीकरण / शिबीर इ.)
- ग्राम आरोग्य, पोषण पाणी पुरवठा व स्वच्छता समितीचे प्रश्न स्थानिक पातळीवर सोडवावेत. जर समस्या स्थानिक पातळीवर सुटत नसतील तर प्राथमिक आरोग्य केंद्राचे वैद्यकीय अधिकारी यांचे पातळीवर

सोडवाव्यात. तरीही समस्या सुटत नसतील तर तालुका वैद्यकीय अधिकारी स्तरावरुन सोडवाव्यात. ग्राम आरोग्य, पोषण पाणी पुरवठा व स्वच्छता समितीच्या कामकाजात तालुका आरोग्य अधिकारी यांचा सहभाग वाढवावा.

- वैद्यकीय अधिकारी यांनी नियमितपणे समितीचे मुल्यमापन करावे. तसेच प्राथमिक आरोग्य केंद्र स्तरावर अंगणवाडी कार्यकर्तीकडून खर्चाचा आढावा घेणेसाठी मुद्देसूद नमुने / तक्ते तयार करावेत.

आशा, आशा गटप्रवर्तक, अंगणवाडी सेविका, ए.एन.एम. व आरोग्य सेवक यांनी समितीच्या प्रत्येक बैठकीला तसेच समितीने आयोजित केलेल्या कार्यक्रमामध्ये उपस्थित रहाणे बंधनकारक आहे. समितीस कार्यक्रम आयोजित करण्यासाठी लागणारी मदत संबंधित सर्व कर्मचाऱ्यांनी करावी. गावामध्ये कोणत्याही आरोग्य संस्थेचे बांधकाम/दुरुस्ती होत असल्यास त्या बांधकामावर देखरख व त्यासंदर्भात काही प्रश्न असल्यास तो वरिष्ठ पातळीवर कळविण्याची जबाबदारी समितीची असावी.

६) इतर विभाग जसे पाणी, शिक्षण, स्वच्छता आणि महिला व बालकल्याण विभाग यांच्या प्रतिनिधींची भूमिका व जबाबदाऱ्या –

आरोग्य, स्वच्छता – सांडपाण्याची व्यवस्था, पिण्याचे पाणी आणि पोषण याबरोबरच शिक्षण विशेषकरुन या अंतर्गत येणारे कार्यक्रम जसे मध्यान्ह भोजन तसेच महिला व बालकल्याण विभागामार्फत चालविण्यात येणारे कार्यक्रम इत्यादी सर्व ग्राम आरोग्य, पोषण पाणी पुरवठा व स्वच्छता समितीच्या कार्यकक्षेत येतात. त्यामुळे ग्राम आरोग्य, पोषण पाणी पुरवठा व स्वच्छता समितीने याबद्दलच्या गावात मिळणाऱ्या सेवांवर देखरेख करावी तसेच याबाबत आढावाही घ्यावा. जेणेकरुन आरोग्यास कारणीभूत घटक जसे पिण्याचे पाणी, स्वच्छता – सांडपण्याची व्यवस्था, महिला साक्षरता, पोषण आणि महिला व बाल आरोग्य याबाबत काही एकत्रित कृती आराखडा तयार करता येऊ शकतो. त्यामुळे या विभागातल्या प्रतिनिधींनी त्यांच्या कार्यक्रमांच्या अंमलबजावणी तसेच काम किती झाले आहे याबाबत आढावा समितीसमोर मांडावा. तसेच समितीस अमंलबजावणी व अडचणींवर ठोस उपाययोजना करता येऊ शकतील. यामुळे आरोग्यास कारणीभूत घटकांमध्ये ही सुधारणा होण्यास मदत होईल.

या समितीच्या देखरेखीमुळे गावपातळीवर मिळणाऱ्या या सेवांचा दर्जा सुधारेल व व अधिक जबाबदार सेवा मिळू शकतील.

७) सदस्य सचिव आणि समिती बैठकांचे संयोजक –

अ) समिती बैठकीची तारीख, वेळ व ठिकाण नक्की करण्याची जबाबदारी अंगणवाडी कार्यकर्तीची राहील.

ब) समितीच्या बैठका नियमितपणे होतील तसेच सर्व सदस्य बैठकीला उपस्थित राहतील याची ती खात्री करेल.

क)गावांच्या आरोग्यविषयक अडचणी किंवा आरोग्यस्तरातील सुधारणा झाली असल्यास त्यासंबंधी समिती सदस्यांचे लक्ष वेधून घेणे व त्याबाबतीत योग्य नियोजन करण्यास चालना देणे.

ड) गावपातळीवरील नियोजनासाठी माहिती गोळा करण्याच्या प्रक्रियेत एएनएम व आशांच्या मदतीने पुढाकार घेणे व त्यास चालना देणे उदा. गावाची लोकसंख्या, माता व बालमृत्यूची आकडेवारी, जननी सुरक्षा योजना / जननी शिशु सुरक्षा कार्यक्रमांचे लाभार्थींची आकडेवारी, लसीकरण झालेली बालके, कुपोषित मुलांची संख्या, तसेच त्यातील पोषण पुर्नवसन केंद्रात पाठविलेल्या मुलांची संख्या, वंचित कुटुंबांची माहिती व कुटुंबांची संख्या जसे दारिद्रयरेषेखालील घरे, अनुसूचित जाती जमातीतील कुटुंबे, पुरुष कुटुंबप्रमुख नसलेली घरे, शेतजमीन नसलेली घरे, रोजंदारीवर जगणारी कुटुंबे, अतिदुर्गम – वाडयावस्त्यांवर राहणारी कुटुंबे, स्थलांतरीत मजूर आणि अपंग व्यक्ती

इ)आरोग्य तसेच इतर संबंधित घटकांमध्ये आढळून आलेल्या कमतरतांची नोंद करणे. यात नुसत्या कमतरतांची नोंद न करता त्यासाठी कारणीभूत घटक कोणते? सर्वांनी मिळून त्यावर काय उपाययोजना करावी यासंबंधीचा निर्णय आणि त्या उपाययोजना करण्यासाठी सर्वांना कामे वाटून देणे, ठराविक वेळेत ते काम पुर्ण होण्याची आखणी करुन देणे व त्यासंदर्भातील पाठपुरावा व त्यांची नोंद करणे.

फ) समिती बैठकीत झालेल्या निर्णयाप्रमाणेच अबंधित निधीचा खर्च झाला आहे याची खात्री करणे. तसेच नियमितपणे कॅशबुक अद्ययावत ठेवून निधी संबंधातील सर्व आवश्यक नोंदी त्यात कराव्यात.

ग) दर महिन्याच्या बैठकीत निधी कोणकोणत्या बाबींवर खर्च झाला आहे याची मांडणी करणे व ३ महिन्यातून एकदा खर्चाच्या पावत्या, व्हाऊचर्स इत्यादीसह सर्व खर्च मांडणे.

ह) समिती अध्यक्षाबरोबर समितीच्या निरनिराळया योजना / कामे / बाबी व खर्च यांचा वार्षिक अहवाल ग्रामसभेत मांडण्यासाठी मदत करणे. तसेच खर्चाचे सामाजिक लेखापरिक्षण व खर्चाचा अहवाल ग्रामपंचायतीकडून मान्यता घेणे इत्यादी मध्ये ही आशाची भूमिका व जबाबदारी आहे. तसेच हा खर्चाचा अहवाल आशा गटप्रवर्तक यांनाही वेळेवर सादर केला गेला पाहिजे.

ई)आशा या समितीमध्ये मध्यस्थाची भूमिका पार पाडतात तसेच अंगणवाडी सेविकेला मदतनीस म्हणून कार्य करतात. उदा. समिती सभेसाठी सदस्यांना आमंत्रित करणे, इतिवृत्त व रजिस्टर मेनटेन करणे इ.

प्रकरण ३ रे

ग्राम आरोग्य, पोषण पाणी पुरवठा व स्वच्छता समितीची अपेक्षित कामे

ग्राम आरोग्य, पोषण पाणी पुरवठा व स्वच्छता समितीची अपेक्षित कामे ही साधारणपणे ९ गटात विभागलेली आहेत.



वरील चित्रात दाखविल्याप्रमाणे ग्राम आरोग्य, पोषण पाणी पुरवठा व स्वच्छता समितीला तिच्या सुरळीत कामकाजाकरीता काही कामे जशी नियमितपणे मासिक बैठका घेणे, आरोग्यासाठी अबंधित निधीचे नियोजन करणे, त्या निधीचा व्यवस्थित हिशेब व सर्व आवश्यक दस्तऐवज योग्यरित्या ठेवणे इत्यादी करावी लागतात.

याशिवाय दुसरा महत्वाचा कामाचा प्रकार म्हणजे –

गावातील सार्वजनिक सेवांवर देखरेख ठेवणे व त्याचा वापर सुलभ व सुकर होण्यासाठीच्या प्रक्रियेला चालना देणे, आरोग्याबद्दल जाणीव व जागृती करण्यासाठी

एकत्रित कार्यक्रम घेणे, ग्राम आरोग्य आराखडयाचे नियोजन करणे तसेच गावातील आरोग्य सेवांवर लोकाधारीत देखरेख प्रक्रिया घडवून आणणे.

३.१ ग्राम आरोग्य, पोषण पाणी पुरवठा व स्वच्छता समितीच्या मासिक बैठका :-

समितीचे काम नियमितपणे व व्यवस्थित होण्यासाठी नियमित मासिक बैठका होणे हे खूप महत्वाचे आहे. निधी उपलब्ध नसला तरी समितीच्या बैठका नियमितपणे घेतल्या पाहिजेत. नियमित बैठका होत असतील तर आपण असे म्हणू शकतो की, गावात समितीचे काम नीटपणे चालू आहे. गावातील आरोग्यसेवांचा आढावा व त्यावर नियोजन हे या बैठकांमध्येच केले जाते. याच मंचावर निरनिराळया आरोग्यविषयक तसेच त्याच्याशी निगडीत विषयांवर चर्चा होऊन त्यावर योग्य त्या उपाययोजना व कृती करता येऊ शकते.

तसेच या बैठकांमध्ये आरोग्य सेवा पुरविणाऱ्यांना (डॉक्टर, ए.एन.एम.) यांना गावाच्या आरोग्यविषयक गरजा काय? काय अडचणी आहेत? हे समजून घेता येऊ शकते व गावातील लोकांनाही त्यांचा दृष्टिकोन काय हे समजून घेता येऊ शकते.

उदा. गावात शौचालय बांधून घ्यायला गावकऱ्यांकडून टाळाटाळ होत असेल तर गावपातळीवर काम करणाऱ्या शासकीय कर्मचाऱ्यांना या मागचं कारण व्यवस्थितपणे समजणार नाही. परंतू या बैठकांमधून अशा विषयांवर चर्चा होऊन संवाद वाढेल व एकमेकांचे दृष्टिकोन समजून घेता येऊ शकतील. त्यानुसार योग्य उपाययोजना व कृती करता येऊ शकेल.

- बैठक किती व कधी घेतल्या पाहिजेत **?**

  महिन्यातून किमान एकदा तरी बैठक घेतलीच पाहिजे. महिन्यातील एक दिवस हा समिती बैठकीसाठी ठरवून घेतला पाहिजे. जसे – दर महिन्याची १० तारीख किंवा महिन्याचा तिसरा शनिवार वगैरे. सर्व समिती सदस्यांना यामुळे बैठकीची तारीख व दिवस आधीच माहित असेल व ते त्याप्रमाणे त्यांच्या कामाचं नियोजन करतील जेणेकरुन त्यांना बैठकीस उपस्थित राहता येऊ शकेल.

- बैठकीचे संयोजन कोणी करावे**?**

  अध्यक्ष, सदस्य सचिव आशा व आशा गटप्रर्वतक यांनी मिळून बैठकीचे संयोजन करावे. सदस्य सचिव व आशा या दोघींनी समिती सदस्यांना बैठकी संदर्भात आठवण करुन द्यावी व सर्व सदस्यांना बैठकीस उपस्थित राहण्यासाठी प्रवृत्त करावे.

- बैठक सुरळीतपणे होण्यास मदत कोण करेल?

  आशा आणि आशा गटप्रवर्तक हे संपूर्ण बैठक पार पाडण्यात पुढाकार घेतील व मदत करतील.

- हया बैठका कुठे घ्याव्यात?

  साधारणपणे बैठक घेण्याची एकच जागा ठरवावी. सार्वजनिक ठिकाणी जसे अंगणवाडी, ग्रामपंचायत कार्यालय, समाजमंदिर किंवा शाळा अशा ठिकाणी घ्याव्यात. बैठकीची जागा ही सर्व सदस्यांना येण्याजाण्याच्या दृष्टिने सोयीची असावी. तसेच गरज पडल्यास बैठकीच्या ठिकाणात सर्वानुमते बदल केल्यास हरकत नाही. उदा. लांब वाडीवस्तीवर राहणाऱ्या लोकांचे आरोग्यसेवांबद्दलचे प्रश्न समजून घेण्यासाठी व त्यावर योग्य ती उपाययोजना कृती करण्यासाठी तिथे जावून बैठक घेणे महत्वाचे ठरते. एखादी घरगुती हिंसाचाराची केस हाताळायची असल्यास ती घटना घडली त्या घराजवळ किंवा त्या वस्तीत जाऊन बैठक घेतल्यास अधिक परिणामकारक होऊ शकेल. परंतू बैठकीच्या ठिकाणातील बदल हा सर्व सदस्य व गावकऱ्यांना पुरेसे दिवस आधी कळविला गेला पाहिजे.

- बैठकीला कुणी उपस्थित असावे?

  ग्राम आरोग्य, पोषण पाणी पुरवठा व स्वच्छता समितीच्या सर्व सदस्यांनी समिति बैठकीला उपस्थित रहायला हवे. त्याव्यतिरिक्त विशेष आमंत्रित जसे तालुका वैद्यकीय अधिकारी, तालुका व जिल्हास्तरावरील पंचायत समितीचे सदस्य इत्यादी. गावातील इतर लोकांनीही बैठकीस उपस्थित राहण्यास काही हरकत नाही. उलट जास्तीतजास्त लोकांनी बैठकीस उपस्थित राहण्याबाबत प्रोत्साहन द्यायला हवे. गावातील वंचित गट तसेच दुर्लक्षित घटकातील लोकांचे प्रतिनिधीत्व बैठकीत होईल याची जरुर खात्री करावी. तसेच समिती बैठकीस उपस्थित राहण्याचे निमंत्रण देणेसाठी समितीचे कार्यालयीन शिर्षक (Letter head) असलेले पत्र तयार करावे.

- ग्राम आरोग्य, पोषण पाणी पुरवठा व स्वच्छता समितीची देखरेख व मदत कोण करेल ?

  आशा गटप्रवर्तक व तालुका संघटक हे समितीची देखरेख व मदत करु शकतील.

आर्थिक वर्षाच्या सुरुवातीपासून निधी अप्राप्त असला तरी समिती सभा नियमितपणे आयोजित कराव्यात. समिती सभेमध्ये चर्चा करुन त्रैमासिक कार्यक्रम (Quarterwise program) ठरवावा. त्रैमासिक कार्यक्रमांचा प्रस्तावित आराखडा तक्ता क्र.१ मध्ये देण्यात आला आहे. हा आराखडा प्रस्तावित असून यानुसार कार्यक्रम आराखडा समितीने तयार करावा, त्यानुसार त्याची अंमलबजावणी करावी. तसेच एखादया सभेला सदस्यांची पुर्ण उपस्थिती नसल्यास सभा तहकूब करुन पुढील तारीख ठरवावी. सभेस अध्यक्ष उपस्थित नसल्यास समिती सदस्यांनी त्या सभेसाठी त्यांच्यातील एका सदस्याची अध्यक्ष म्हणुन नेमणुक करावी व सभा आयोजित करावी. तालुका विस्तार अधिकारी यांच्या सहकार्याने तालुका आरोग्य अधिकारी / वैद्यकीय अधिकारी यांनी समिती सभा नियमित होणेकडे लक्ष पुरवावे.

- सभेचे इतिवृत्त –
  - ✓ सभेचे इतिवृत्त नमुना (format) मध्ये दिल्यानूसार तयार करावे.(तक्ता क्र.२)
  - ✓ समिती सभेनंतर दोन दिवसात अंगणवाडी सेविका यांनी आशांच्या मदतीने इतिवृत्त तयार करावे
  - ✓ आशांनी अध्यक्ष व अंगणवाडी सेविका यांच्या स्वाक्षरीने सर्व सदस्यांना इतिवृत्ताची प्रत दयावी.
  - ✓ समिती सभेच्या इतिवृत्तानूसार मंजूर बाबींवर निधी खर्च करणे आवश्यक आहे.
  - ✓ समितीची मंजूरी न घेता निधी खर्च केलेला आढळल्यास वित्तीय अनियमितता म्हणून गृहित होते.
  - ✓ तात्काळ उदभवलेल्या परिस्थितीत समितीची मंजूरी न घेता निधी खर्च केलेला असल्यास पूढील सभेमध्ये सदर खर्चास समितीची कार्योत्तर मंजूरी घेणे आवश्यक आहे.

३.२ अबंधित निधी व निधी खर्चासाठीची मार्गदर्शक तत्वे :–

रु.१०,०००/– चा वार्षिक अबंधित निधी प्रत्येक ग्राम आरोग्य, पोषण पाणी पुरवठा व स्वच्छता समितीला देण्यात येतो.

- हा अबंधित निधी कशासाठी देण्यात येतो?

  गावातील आरोग्यासंदर्भात गरजांचे नियोजन, कृती आराखडा तयार करुन त्याची अमंलबजावणी करणे यासाठी प्रामुख्याने हा अबंधित निधी दिला जातो. या कामाकरीता इतर निधीचे स्त्रोत वापरणे ही या समितीकडून अपेक्षित आहे. तसेच या समिती निधीमध्ये गावकऱ्यांनीही आपले योगदान द्यावे व त्यास प्रोत्साहन द्यावे. गावकऱ्यांचे योगदान हे पैसा किंवा इतर काही वस्तू, श्रमदान, अशा स्वरुपातीलही असू शकते.

- अबंधित निधीचा वापर कशासाठी करता येऊ शकतो ?

  गावाचा आरोग्यस्तर सुधारण्यासाठीच्या कुठल्याही कामासाठी समिती हा अबंधित निधी वापरु शकते. पोषण, शिक्षण, स्वच्छता व सांडपाणी व्यवस्था, पर्यावरण रक्षण आणि सार्वजनिक आरोग्य इत्यादी सारख्या विषयांवर हा निधी खर्च केला जाऊ शकतो. निधी खर्चासंबंधित निर्णय हे समिती बैठकीतच घेण्यात यावे व खालील तत्वांवर आधारीत खर्चाचा निर्णय घेण्यात यावा.

  - अशा बाबींवर किंवा कार्यक्रमांवर निधी खर्च व्हावा ज्याचा फायदा हा सर्व गावासाठी सर्व समाजासाठी होईल. फक्त एक व दोन कुटुंबासाठी फायदेशीर होणाऱ्या बाबींवर खर्च करण्यात येऊ नये.

  - परंतू काही अपवादात्मक परिस्थितीत जसे खूप गरीब कुटुंबातील किंवा परितक्त्या महिला असल्यास अशावेळी त्यांच्या आरोग्य संदर्भातील गरज भागवायला हा निधी खर्च केला जाऊ शकतो.

  - उदा. गावात एक न्युमोनियाचा संशयीत गरीब रुग्ण होता. त्याच्याकडे जवळच्या ग्रामीण रुग्णालयात उपचारासाठी जाण्यासाठीचे सुध्दा पैसे नव्हते. हे ग्राम आरोग्य, पोषण पाणी पुरवठा व स्वच्छता समितीच्या लक्षात आल्यावर त्यांनी या निधी मधून पैसे तर दिलेच परंतू एक सदस्य त्याच्याबरोबर ग्रामीण रुग्णालयातही सोबत म्हणून गेला.

  - एका गावात एका महिलेचा प्रसूतीनंतर लगेचच मृत्यू झाला. त्या महिलेचे कुटुंब इतके गरीब होते ही त्या बाळाला दूध देण्याइतके देखील त्यांच्याकडे पैसे नव्हते ते त्या बाळाला फक्त तांदळाचे पाणी देऊ शकत होते. त्यामुळे बाळ दिवसेंदिवस कुपोषित होऊ लागलं होते. हे बघून

ग्राम आरोग्य, पोषण पाणी पुरवठा व स्वच्छता समितीने त्या बाळाला सहा महिन्यापर्यंत रोज दूध देण्याचा निर्णय घेतला.

- या निधीचा वापर अशा बाबींवर किंवा कामावर करु नये ज्यासाठी पंचायतराज संस्था किंवा इतर विभागांकडून निधी व मदत मिळत असते.
- उदा. अंगणवाडी इमारत दुरस्ती, रस्ते बांधणी किंवा सांडपाणी व्यवस्था बांधणी, अंगणवाडीतील भांडीकुंडी साहित्ये व खेळणी खरेदी अशा सारख्या बाबींवर हा निधी खर्च करु नये कारण या कामासाठी निधीची तरतूद ही त्या त्या विभागातून जसे महिला व बालकल्याण विभाग, ग्रामविकास, सार्वजनिक बांधकाम विभाग किंवा वनविभाग अशा सारख्या विभागातून झालेलीच असते.
- काही अपवादात्मक परिस्थितीत जिल्हयाकडून ग्राम आरोग्य, पोषण पाणी पुरवठा व स्वच्छता समितीला अशा बाबींवर खर्च करण्यासंबंधी सूचना येऊ शकतात परंतु अशा वेळेसही हयाबाबत समितीत चर्चा होऊन सर्वांची मान्यता घेऊनच निर्णय घेतला जावा.
- एखाद्या कामासाठी आवश्यक सामुग्री इथून घ्या, याच लोकांकडून किंवा दुकानामधून घ्या अशा सारख्या सूचना वा दबाब कुणीही समितीवर आणू शकत नाही.
- जर समितीला तात्काळ वाहन व्यवस्थेसाठी कुणाचे वाहन भाडयाने घ्यावयाचे असल्यास किंवा एखादे मशिन/साहीत्य/वस्तू खरेदी करावयाचे असल्यास आरोग्य खात्यातील कर्मचारी किंवा इतर कुणीही याबाबत समितीला/ अंगणवाडी सेविकेला सूचना वा दबाव आणू शकत नाही.
- सर्व खर्च हे समितीव्दारे परस्पर कुणाच्याही मध्यस्थी शिवाय केले जावेत. याचा अर्थ असा की, कुणीही अगदी आरोग्य खात्यातील कर्मचाऱ्यांनेही समितीकडून पैसे घेऊन पुरवठादारास नेऊन देऊ नयेत.

- खर्चाचे प्रमाण –

  समिती निधी हा फक्त अंगणवाडी मधील बाबींवर खर्च करण्यासाठी नसून तो आरोग्य, पोषण, स्वच्छता व पाणी पुरवठा याबाबींवरही खर्च करणे अपेक्षीत आहे. समिती निधीच्या खर्चाचे प्रमाण सर्वसाधारणपणे खालील प्रमाणे असावे.

  आरोग्य – ६०% / पोषण – २०% / स्वच्छता – १०% / पाणीपुरवठा – १०%

या व्यतिरिक्त ग्राम आरोग्य, पोषण, पाणी पुरवठा व स्वच्छता समितीने त्यांच्या आवश्यकतेनुसार निर्णय घेऊन निधी खर्च करावा.

- निधी खर्चाच्या बाबी –

अ) आरोग्य –

१. आपातकालीन परिस्थितीत अत्यावस्थ रुग्णास तातडीच्या सेवांची उपलब्धता करुन देणे. उदा.संदर्भसेवेसाठी वाहन उपलब्ध नसल्यास गावातील इतर वाहनाची सोय करुन देणे व त्यासाठी खर्च ग्राम आरोग्य, पोषण पाणी पुरवठा व स्वच्छता समितीला निधी मधून करणे.

२. आरोग्य संस्थांच्या कामकाजाबाबत, उपलब्ध योजनांबाबत माहिती होणेसाठी ग्राम आरोग्य, पोषण पाणी पुरवठा व स्वच्छता समिती सदस्यांनी आरोग्य संस्थांना भेट देणे.

३. साथीचे आजार / रक्तदाब / विविध आजार / मासिक पाळी इ. व इतर अशा अनेक बाबींसाठी जनजागृतीपर कार्यक्रमांचे आयोजन करणे आवश्यक आहे.

ब) पोषण –

१. अंगणवाडी / प्राथमिक किंवा माध्यमिक शाळा यांच्या परिसरात परस बाग विकसित करावी. समितीने परसबागेत पोषणयुक्त भाज्यांची लागवड करण्यासाठी छोटेखानी कार्यक्रम आयोजित करावा.

२. पोषणयुक्त आहार मिळणेसाठी पालकांना अनूभवी लोकांच्या माध्यमातून आहार प्रात्यक्षिके आयोजित करणे.

३. किशोरवयीन मुलींमधील रक्तक्षयाबाबत जनजागृतीपर कार्यक्रम आयोजित करणे.

४. आरोग्य शिबिर आयोजित करणे.

क) स्वच्छता –

१. सार्वजनिक शौचालय स्वच्छता

२. शौचालयांमध्ये सांडपाण्याच्या पाईपला जाळी बसविणे.

३. डासोत्पत्ती ठिकाणे नाहीसी करण्यासाठी पाणी वाहते करणे.

४. गरजेनुसार हिवताप/डेंगी साथीचे वेळी धूरळणी करणे.

५. गावातील सार्वजनिक ठिकाणांच्या स्वच्छतेवर भर देणे.

६. निर्मलग्राम (हगणदारीमुक्त) करणेसाठी जनजागृतीपर कार्यक्रम घेणे.

ड) पाणीपूरवठा –

१. गावातील पाणवठाचा परिसर स्वच्छ ठेवणे.

२. हातपंप, नळगळती दुरुस्ती यासाठी ग्रामपंचायत निधी उपलब्ध नसल्यास VHNSC निधी समितीच्या मंजूरीने वापरावा.

३. अतिसार साथीचे वेळी ग्रामपंचायतमध्ये ब्लिचिंग पावडर खरेदीसाठी निधी उपलब्ध नसल्यास VHNSC निधी समितीच्या मंजूरीने वापरावा.

इ) इतर आवश्य बाबी–

१. समितीचे कामकाजासाठी स्टेशनरी खरेदी

२. समिती सभेसाठी चहा पाणी खर्च.

३. भिंतीवर गेरुने म्हणी लिहून जनजागृती करणे.

- समिती निधी खालील बाबीवर खर्च करु नये –

१. बांधकाम व इमारत दुरुस्ती तसेच परिसर स्वच्छता, गवत काढणे अशा बार्बीवर खर्च करु नये.

२. अंगणवाडीतील मुलांसाठी कोणत्याही प्रकारचे खायचे पदार्थ (प्रोटीन पावडर व बिस्किट) यांवर समिती निधीमधून खर्च करण्यात येऊ नये.

३. अंगणवाडीमध्ये सुशोभिकरणाच्या वस्तू, वजनकाटे, पाण्याचे फिल्टर, चटई इ. या निधीमधून खरेदी करु नये.

३.३ समिती (अबंधित) निधीचे व्यवस्थापन :–

- अबंधित निधीचे व्यवस्थापन हे संपूर्णपणे ग्राम आरोग्य, पोषण, पाणी पुरवठा व स्वच्छता समितीच्या अधिकारात असले पाहिजे.

- निधीच्या वापरामध्ये पूर्णपणे पारदर्शकता असली पाहिजे आणि निधी वापराबद्दलच्या निर्णय प्रक्रियेत सर्वांचा सहभाग असला पाहिजे.
- निधीबद्दलचे निर्णय हे समिती बैठकीतच घेतले पाहिजे व त्याचे इतिवृत्त तयार करुन त्यावर सर्व उपस्थित सदस्यांच्या सहया घ्याव्यात. या निर्णयप्रक्रियेमध्ये एकूण सभासद संख्येच्या किमान ६०% सभासदांचे एकमत हवे.
- समिती बैठकीचे नियोजन, इतर आकस्मित खर्च इत्यादीसाठी सदस्य सचिवाला या निधीतून छोटी रक्कम खर्च करु द्यावी. परंतू या खर्चाच्या पावत्या, देयके हे सदस्य सचिवाने पुढच्या समिती बैठकी दरम्यान सादर करावीत. या खर्चाला समितीने कार्योत्तर मान्यता द्यावी.

- खरेदी प्रक्रिया –

१. धनादेशाने रक्कम अदा करतांना बहुतांशी वेळा अडचणी येतात.त्यासाठी अंगणवाडी सेविकेकडे कमीत कमी १०००/- रु. शिल्लक ठेवावेत व त्याच्या खर्चाची नोंद त्यांच्या जमाखर्च नोंदवहीत करावी.

२. नियमाप्रमाणे रुपये १,०००/– व जास्त किंमत असलेल्या वस्तूच्या खरेदीसाठी दरपत्रक (कोटेशन) पध्दती वापरावी. किमान ३ दरपत्रके मागवावी व त्यातील कमीत कमी दर असलेल्या दरपत्रकाची निवड करावी.

३. समितीचे खात्यामध्ये किमान रुपये १००/– ते १५००/– पर्यत शिल्लक ठेवणे बंधनकारक असते त्यामुळे निधी अखर्चित राहतो. यासाठी जिल्हाधिकारी यांच्या स्तरावरुन सर्व बँक व्यवस्थापकांना राष्ट्रिय आरोग्य अभियानाचे खातेवर शुन्य शिल्लक (Zero balance) अकाउंट करणेसाठी जिल्हास्तरावरुन उपाययोजना करावी.

<u>समिती निधीचा हिशेब – जमाखर्चाच्या नोंदी :–</u>

- वर्षातून चारदा घेतल्या जाणाऱ्या ग्रामसभेत वा दर ३ महिन्यांनी होणाऱ्या ग्रामपंचायतीच्या बैठकींमध्ये ग्राम आरोग्य, पोषण पाणी पुरवठा व स्वच्छता समितीचा बाबनिहाय झालेल्या खर्चाचा हिशेब मांडावा.
- ग्राम आरोग्य, पोषण पाणी पुरवठा व स्वच्छता समितीचा वार्षिक खर्चाचा अहवाल हा समितीने तयार करुन तालुका आरोग्य अधिकारी यांना सादर करावा व याची एक प्रत ग्रामपंचायतीस द्यावी.

- अबंधित निधी खर्चासंबंधित सर्व पावत्या, देयके इत्यादी ३ वर्षापर्यंत जतन करुन ठेवाव्यात. लेखापरिक्षण वा तपासणी गटास जेंव्हा आवश्यकता असेल तेंव्हा ग्रामपंचायतीत ते सादर करावे. त्यानंतर वार्षिक खर्चाचे अहवाल हे पुढील १० वर्षापर्यंत तरी जतन करुन ठेवावेत.
- निधी समितीच्या खात्यात जमा झाल्यानंतर पुढील १२ महिन्यांच्या कालावधीत निधी खर्च करण्याची मुभा असावी. जर निधी जमा व्हायला उशिर झाला असेल तर आर्थिक वर्ष संपल्यानंतर पुढे ६ महिन्यांचा कालावधी समितीला निधी खर्च करण्यासाठी द्यावा. खर्चाचा अंतिम अहवाल सादर केल्यानंतर जर काही अखर्चित अनुदानशिल्लक राहत असेल तर त्यास अखर्चित अगाऊ रक्कम (अग्रीम स्वरुपात) समजावी व त्यात वार्षिक निधीसाठीची उर्वरित रक्कम जमा करुन समितीला पूर्ण अबंधित निधी द्यावा.

ग्राम आरोग्य, पोषण पाणी पुरवठा व स्वच्छता समिती व त्याअतंर्गत प्राप्त अबंधित निधीचे सामाजिक अंकेक्षण (**Social Audit)**–

ग्राम आरोग्य, स्वच्छता व पोषण समिती अतंर्गत दरवर्षी प्राप्त अबंधित निधीचे सोशल ऑडीट करण्यात यावे. हे सोशल ऑडिट करताना स्थानिक संस्था संघटनांना सहभागी करता येईल. ज्या ठिकाणी संस्था संघटना नसतील त्या गावांमध्ये सोशल ऑडिट घेण्याची जबाबदारी त्या कार्यक्षेत्रातील वैद्यकिय अधिकाऱ्याची असेल. हे सोशल ऑडिट विशेष आरोग्य ग्रामसभेमध्ये घेण्यात यावे. सोशल ऑडिटमध्ये आरोग्य समितीने केलेल्या कामाचे मूल्यमापन तसेच अबंधित निधीच्या जमाखर्चाचे मूल्यमापन गावातील लोक करतील. समितीने वर्षभरात केलेली कामे व निधीचा जमाखर्च लोकांसमोर मांडावा. सोशल ऑडिटमधून पुढे आलेले मुददे ग्रामसभेमध्ये चर्चिले जाऊन त्यावर तिथे निर्णय घेण्यात यावा.

पेसा कायदा (Panchayat Extension to Scheduled Area Act,1996) लागू असलेल्या क्षेत्रात ग्राम आरोग्य, स्वच्छता व पोषण समिती अंतर्गत होणाऱ्या खर्चाच्या उपयोगिता प्रमाणपत्रास ग्रामसभेमध्ये मंजूरी घेणे गरजेचे आहे. तसेच पेसा कायदयाच्या तरतूदीप्रमाणे समितीचे कामकाज व खर्चाचे सोशल ऑडीट ग्रामसभेमध्ये करण्यात येईल.

३.४ नोंदी ठेवण्यासंदर्भात :-

समितीचे कामकाजासंबंधी व जमा खर्चाच्या आवश्यक त्या नोंदी ठेवणे हे समितीच्या कामाच्या दृष्टीने अत्यंत महत्वाचे तसेच फायदेशीर आहे.

१) समिती बैठकीमध्ये नोंद व उपस्थित सदस्यांच्या स्वाक्षरी :- या अंतर्गत बैठकीस समिती सदस्यांची उपस्थितीबाबत नोंद तसेच बैठकीचा इतिवृत्तांत यांचा समावेश होतो. खर्चाबाबतचे जे काही महत्वाचे निर्णय झाले असतील त्याच्या नोंदी करुन ठेवणे अत्यंत आवश्यक आहे. या निर्णयावर सर्व उपस्थित सदस्यांच्या सहया घेणे आवश्यक आहे. त्याचप्रमाणे इतर काही महत्वाचे निर्णय व घडामोडी बैठकीत झाल्या असतील जसे सभासद संख्येतील किंवा स्वतः सभासदच बदलेले असल्यास इत्यादी बाबी हया समिती बैठकीच्या इतिवृत्तात व नोंदवहीत नोंदवून ठेवाव्यात.

२) रोख नोंदवही (कॅश बुक)- खर्चाचे व जमेच्या नोंदी कशा ठेवाव्यात यासाठी आशाताईंना वापरता येईल असा नोंदीसाठीचा सोपा विहीत नमुना या पुस्तिकेच्या शेवटी दिलेला आहे.

३) बॅंकेचे खाते पुस्तक- बॅक खाते पुस्तक नेहमी अद्ययावत असले पाहिजे.

४) ग्राम आरोग्य, पोषण पाणी पुरवठा व स्वच्छता समितीचा खर्चाचा अहवाल - रोख नोंदवही बरोबर खर्चाचा मासिक अहवाल ही तयार करावा. यामुळे समितीने निरनिराळया बाबींवर व कार्यक्रमांवर केलेल्या खर्चाचा तपशील व्यवस्थित मिळतो व जेंव्हा गरज पडेल तेंव्हा सादरही करता येऊ शकतो. वेळोवळी होणाऱ्या ग्रामसभेत हा सादर करण्यासाठी उपयुक्त ठरु शकतो. तसेच ग्रामसभेव्दारा तालुका पातळीवर राष्ट्रीय आरोग्य अभियानाच्या कार्यक्रम अधिकाऱ्यांस पाठविण्यासही वापरता येऊ शकतो.

वरिल नोंदीबरोबर खाली दिलेल्या बाबींचीही नोंद व रेकॉर्ड ठेवलं पाहिजे.

१. गाव आरोग्य नोंदवही

२.सार्वजनिक सेवांवर लोकाधारीत देखरेख करण्यासाठीचे साधन व नोंदवही

३. मृत्यूची नोंदवही

४. जन्माची नोंदवही

३.५ सार्वजनिक सेवांवर देखरेख व वापरास चालना देण्यासंदर्भात –

- गाव आरोग्य नोंदवहीच्या वापरासंदर्भात :-

  या नोंदवहीत गावातील लोकसंख्या, घरांची संख्या, दारिद्र्यरेषेखालील घरे (धर्म, जात, भाषा इत्यादींसह) आरोग्य, पाणी, स्वच्छता व पोषणासंदर्भातील सेवा मिळत असलेल्या लाभार्थ्यांची यादी इत्यादी माहिती असावी.

  या महितीच्या आधारे समितीला सार्वजनिक सेवा मिळण्यापासून कोणी वंचित राहिले आहे का? याबाबत समजू शकेल. एकदा वंचित ग्रामस्थ कोण आहेत हे कळल्यावर त्यासाठी उपाययोजनांवर भर देता येऊ शकतो.

  - गावांमध्ये सार्वजनिक सेवा या सर्वांना मिळत आहेत ना तसेच त्यांचा दर्जा काय आहे हे बघण्यासाठी या साधनांचा वापर करता येऊ शकतो.

सार्वजनिक सेवांवर ग्राम आरोग्य, पोषण पाणी पुरवठा व स्वच्छता समितीचा समितीव्दारे देखरेख

तसेच दरमहिन्याला किमान महत्वाच्या निर्देशांकाबाबत माहिती भरता येईल व तुलना करुन त्यावर आवश्यक उपाययोजना करता येऊ शकतील.

३.६ आरोग्याबाबत जनजागृती व शिक्षण होण्यासाठी गावातील लोकांनी मिळून काही कृती कार्यक्रम करणे :- ग्राम आरोग्य, पोषण पाणी पुरवठा व स्वच्छता समितीचा ही गावासाठी प्रेरणादायी ठरु शकते. या समितीने पुढाकार घेऊन काही लोकांनी मिळून करावयाच्या कृती कार्यक्रमांचे नियोजन करावे व ठरल्याप्रमाणे प्रत्यक्षात आयोजन करावे.

उदाहरणार्थ :- श्रमदान करणे, गाव स्वच्छता अभियानाचे आयोजन करणे, सांडपाणी व्यवस्थेसंदर्भातील अभियानाचे आयोजन इ.

- <u>समितीच्या माध्यमातून जनजागृती –</u>

निधी खर्च करणे एवढा मर्यादित उददेश न ठेवता समितीच्या माध्यमातून जनजागृती व गावाच्या विकासासाठी नियोजन करणे आवश्यक आहे. यासाठी खालील बार्बीचा समावेश करावा.

१) पालक सभा– गावात अंगणवाडी / प्राथमिक / माध्यमिक शाळा असल्यास पालक सभा आयोजित केल्या जातात. पालक सभांच्या वेळी समितीने आरोग्य पोषण पाणी पूरवठा व स्वच्छता याबाबत माहिती दयावी. जनजागृती कार्यक्रमामध्ये पालकांना सहभागी करुन घ्यावे.

२) आरोग्य विषयक जनजागृती करतांना समितीच्या माध्यमातून उत्कृष्ट काम करणाऱ्यांचा सत्कार समारंभ आयोजित करावा. त्यामध्ये ANM / ASHA / AWW तसेच इतर समिती सदस्य किंवा गावातील रहिवाशी इ. असावेत. सत्कार समारंभाच्या वेळी बक्षीस पात्र म्हणून खजूर पाकिट, लोखंडी तवा, मनूका पाकिट इ. दयावे. सदर खर्च VHNSC निधी मधून करण्यात यावा. सत्कार समारंभ वर्षातून एकदा आयोजित करावा. एकमताने समितीने ठराव घेऊन व्यक्तीची निवड करावी.

३) आरोग्य विषयक उपक्रमांसाठी VHND आयोजनाच्या दिवशी समितीने शिबीर आयोजित करणे. शिबिरामध्ये तालूका आरोग्य अधिकारी, वैदयकिय अधिकारी यांना विशेष आमंत्रित करावे. शिबिराची रुपरेषा, नियोजन, विषय, याबाबत समितीने निर्णय घ्यावेत. जास्तीजास्त जनतेला शिबिराचा फायदा घेण्यासाठी गावात जनजागृती व प्रसिध्दी करावी. वर्षभरात आरोग्य विषयक जनजागृतीसाठी दोन शिबिरांचे आयोजन करावे. शिबिरासाठी आवश्यक खर्च ग्राम आरोग्य, स्वच्छता व पोषण समिती निधीमधून करण्यात यावा. शिबिरामध्ये चर्चा करावयाचे विषय जसे पावसाळी आजार /उच्चरक्तदाब /विविध साथजन्य आजार/मुलांचे पोषण व वाढ/ मासिक पाळी/ महिलांचे कर्करोग/ मुलींची घटती संख्या इत्यादी बाबत जागृती करणे आवश्यक आहे.

४) गेरु रंगकाम करुन जनजागृती करणे – जनजागृतीसाठी IEC सर्वात महत्वाचा भाग आहे. यासाठी कमी खर्चात जास्तीतजास्त जनजागृती/ प्रचार /प्रसिध्दी करणेसाठी गेरु रंगकामाचा वापर करावा. जनजागृती/ प्रचार /प्रसिध्दी करणेसाठी गावातील घरांवर प्रदर्शनीय भागांवर शाळा, समाजमंदिर इत्यादीचा वापर करावा. तसेच श्रमदानातून गेरु रंगकाम करण्यास प्रोत्साहित करावे.

५) योगासनवर्ग आयोजित करणेबाबत – समितीच्या माध्यमातून गावात योगासनवर्ग आयोजित करावेत. योगासनाचे महत्व पटवून दयावे.

६) देणगी मिळविण्यासाठी प्रयत्न करावेत– समितीने केलेली कामे व त्यामूळे गावात झालेला बदल व या पुढे करावयाची कामे या बाबी ग्रामसभेमध्ये मांडाव्यात तसेच समितीच्या पुढील कामांसाठी निधी उभारणे किंवा वस्तू स्वरुपात देणगी देण्यासाठी जनतेला आवाहन करावे. समितीच्या कामांमध्ये लोकसहभाग वाढवावा व जनतेला श्रमदानासाठी प्रवृत्त करावे.

७) ग्राम आरोग्य, स्वच्छता व पोषण समिती निधी फिरता निधी (Revolving fund) म्हणून वापरणेबाबत – गावात दारिद्रयरेषेखालील / दुर्लक्षित / दुर्बल घटकांसाठी आपतकालीन परिस्थितीत निधीची आवश्यकता भासल्यास ग्राम आरोग्य, स्वच्छता व पोषण समिती निधीचा वापर करावा. परंतु सदर निधी फिरता निधी म्हणून वापरणे बंधनकारक आहे (Compulsory Revolving fund).

३.७ सार्वजनिक सेवा देण्यासंदर्भात चालना देणे :-

- ग्राम आरोग्य पोषण दिवसाचे आयोजन करणे तसेच लसीकरण सत्रासाठी आवश्यक ती मदत करणे. यासाठी गावातील गरोदर महिलांना, विशेषतः वंचित गटातील महिलांना माहिती देणे. त्यांना या सत्रास येण्यासाठी प्रोत्साहित करणे तसेच या सत्राच्या आयोजनासाठी आशा, अंगणवाडी सेविका यांनी आरोग्य सेविकेस मदत करणेही अपेक्षित आहे.
- गाव पातळीवर काम करीत असलेल्या कर्मचाऱ्यांना त्यांना येणाऱ्या अडचणी व प्रश्न मांडण्यासाठीचे माध्यम या समितीच्या रुपाने मिळू शकते. तसेच या अडचणीवर कसा तोडगा काढता येईल याबाबतही चर्चा व मदत समितीव्दारे मिळू शकते.
- समिती बैठकामध्ये ज्या कर्मचाऱ्यांना (ए.एन.एम.,शिक्षक, अंगणवाडी सेविका इ.) सेवा देण्यासाठी खूप दूरपर्यंत जावे लागते किंवा कामाचे वेळी अडचणी येतात त्याबाबत चर्चा करुन मार्ग काढला जाऊ शकतो. तसेच अशा कर्मचाऱ्यांना जर कामाच्या वेळी वैयक्तिक टोमणे, छळाला सामोरे जावे लागत असल्यास ही समिती नक्कीच आधार देऊ शकते व मदत करु शकते.

- जर अंगणवाडी व उपकेंद्रात काही महत्वाची आवश्यक साधने नसतील तर ती मिळविण्यासाठी मदत करु शकते.

- ही समिती सेवा घेणाऱ्या आणि देणाऱ्या मधला दुवा होऊ शकते. तसेच दोन्ही बाजूंचे दृष्टीकोन समजण्यासाठी व संवादासाठीचे व्यासपीठ होऊ शकते.
- सार्वजनिक सेवेला मदतीचा हात देणे उदा. स्थानिक पातळीवरील वाहनमालकांशी बोलून गरजेच्या वेळी रुग्णांना दवाखान्यात नेण्यासाठी वाहनव्यवस्था करता येऊ शकते.
- जन्म व मृत्यूची नोंदणी करणे आणि सर्वांना जन्म / मृत्यू नोंदणी प्रमाणपत्र ठरलेल्या कालमर्यादेतच मिळू शकेल याची खात्री करणे.
- ग्राम आरोग्य, पोषण पाणी पुरवठा व स्वच्छता समितीने मृत्यूच्या कारणांवरही भर दिला पाहिजे व कारणाच्या नोंदणी प्रक्रियेचा दर्जा सुधारण्यावरही भर दिला पाहिजे. या माहितीचा फायदा गाव पातळीवरील नियोजन व कृती आराखडयासाठी होऊ शकतो. तसेच मातामृत्यू व बालमृत्यू आणि इतर कुठलाही संसर्गजन्य आजाराचा उद्रेक या संदर्भात माहिती उपकेंद्र ए.एन.एम. / प्राथमिक आरोग्य केंद्रात वैद्यकीय अधिकारी यांना दयावी.

३.८ आरोग्यसेवांवर लोकाधारित देखरेख :-

- प्राथमिक व व्दितीय स्तरावर देण्यात येणाऱ्या आरोग्य सेवांवर लोकाधारित देखरेख करणे.
- प्राथमिक आरोग्य केंद्र व ग्रामीण रुग्णालयास भेटी देऊन त्यांच्यासाठी तयार केलेले प्रगतीपुस्तक पहावे. तसेच तिथल्या कर्मचारी / अधिकाऱ्यांशी व सेवा घेणारे (लाभार्थ्यांशी) संवाद साधावा जेणेकरुन आरोग्य केंद्रात सेवा घेण्यासंदर्भातील अडचणी व प्रश्न यासंबंधी माहिती होऊ शकेल.
- जनसंवादाचे संयोजन :- जनसंवाद हे लोक / समाज व सेवा पुरविणारे अधिकारी या दोघांमधील संवादासाठीचे एक माध्यम असून तक्रारनिवारणासाठीचेही खूप परिणामकारक माध्यम आहे. तसेच चांगले काम केलेली प्राथमिक आरोग्य केंद्र, उपकेंद्र किंवा आरोग्य कर्मचारी यांचा सत्कार / कौतुक करता येते व कमी पडत असलेल्या आरोग्य संस्थांना सुधारण्यासाठीच्या सूचनाही या माध्यमातून देता येऊ शकतात.

- <u>आरोग्य समिती आणि विशेष ग्रामसभा–</u>

विशेष आरोग्य ग्रामसभा आयोजित करण्यासाठी पुढाकार घ्यावा. विशेष आरोग्य ग्रामसभेमध्ये कोणते विषय घ्यायचे आहेत ते ठरवावे व त्यासंदर्भातील सर्व तयारी समितीने करणे अपेक्षित आहे. ग्रामसभेमध्ये झालेल्या निर्णयांचा पाठपुरावा होतोय की नाही याची जबाबदारी समितीकडे असेल. ग्रामसभेमध्ये झालेले निर्णय समितीस बंधनकारक असतील. ग्रामसभेमध्ये समितीच्या कामाचे व अबंधित निधीचे सोशल ऑडिट करण्यात यावे. त्यासाठी समितीने सर्व तयारी करावी. समितीच्या सर्व सदस्यांनी ग्रामसभेला उपस्थित राहून सोशल ऑडिटमध्ये समितीने केलेल्या कामाचा तसेच निधीचा जमाखर्च लोकांसमोर मांडावा. लोकांनी दिलेल्या सूचनांची अंमलबजावणी करण्याची जबाबदारी समितीने घ्यावी.

३.९ ग्राम आरोग्य नियोजन व कृती आराखडा :–

ग्राम आरोग्य नियोजन व कृती आराखडा तयार करणे ही सततची प्रक्रिया असून ती समितीच्या प्रत्येक महिन्याच्या बैठकी दरम्यान केली गेली पाहिजे.

यात खालील बाबींवर चर्चा केली पाहिजे –

- देखरेख नोंदवही व इतर पध्दतीने काय उणिवा (कमतरता) आहे हे पाहणे.
- या कमतरता कुठे आहेत हे पाहणे.
- या कमतरतांची कारणे काय आहेत हे तपासणे.
- या कमतरता / अडचणींवर काय उपाययोजना करता येऊ शकतील याबाबत चर्चा करणे व सर्व गावकऱ्यांनी मिळून कृती आराखडा ठरविणे.
- प्रत्येक कामाची जबाबदारी एका– एका व्यक्तींवर सोपवावी.
- ही सर्व कृती पूर्ण करण्यासाठी वेळापत्रक ठरवून द्यावे व ठरविलेल्या कालावधीत ती कामे पूर्ण करावीत.

  या व्यतिरीक्तही दुसऱ्या एका पध्दतीने हा ग्राम कृती आराखडा तयार करता येऊ शकतो. यात गावाच्या आरोग्याच्या दृष्टीने महत्वाच्या आरोग्य गरजा ओळखून त्यांच्या प्राधान्याने त्यावर योग्य ती कार्यवाही करण्यासाठीचा निरनिराळया स्तरावराचा कृती आराखडा बनवावा. उदा.आरोग्य शिक्षणासंदर्भातील कृती गावपातळीवर राबवावी तर आरोग्यसेवांबाबतच्या उपाययोजना या आरोग्यसेवा स्तरावर शासनास करायला सांगाव्यात.

आरोग्यसेवा संदर्भातील गावपातळीच्या सेवा कोणत्या हे समिती खालील गोष्टींवरुन समजू शकेल :-

१) मृत्यू व त्यांच्या कारणांबद्दल नोंदी ठेवणे. विशेषतः गरोदरमाता व १ वर्षाखालील मुलांच्या मृत्यूची नोंदही झालीच पाहिजे व त्याबद्दल अधिक चौकशी व माहिती मयताच्या कुटुंबियांकडून करुन घ्यावी.

२) मृत्यू नोंदणी व कारणमीमांसा कुठल्या आजाराने गावात किती मृत्यू झालेले आहेत हे समजण्यास होईल व त्याकरिता त्यावर आधारीत प्रतिबंधात्मक उपाययोजना करता येऊ शकतील.

३) अपंग व अधू व्यक्तींबाबतच्या नोंदी ठेवाव्यात.

४) तसेच गावातील लोकांना कुठल्या कारणांसाठी जास्तीत जास्त वेळा आरोग्यकेंद्रात जावे लागते हे समजण्यासाठी गावात गटचर्चा करा.

प्रकरण ४ थे

गावाचा वार्षिक आरोग्य आराखडा

गावाच्या मासिक आरोग्य आराखडयाव्यतिरिक्त ग्राम आरोग्य, पोषण पाणी पुरवठा व स्वच्छता समितीने गावाचा वार्षिक आरोग्य आराखडा ही तयार करावा. गावाच्या आरोग्यविषयक गरजांवर आधारलेला हा आराखडा वर्षातील एका विशिष्ट महिन्यात करावा व दर महिन्याला त्याबाबत आढावा घ्यावा.

४.१ वार्षिक व मासिक आरोग्य आराखडयातील फरक –

या दोन मधील महत्वाचा फरक हा आहे की, मासिक आरोग्य आराखडयात तात्काळ व कमी कालावधीसाठी उपाययोजना आखल्या जातात तर वार्षिक आरोग्य आराखडयात लांबच्या टप्प्याच्या व प्रतिबंधात्मक उपाययोजना आखल्या जाऊ शकतात.

वार्षिक आरोग्य आराखडा तयार करण्याचे महत्वाचे टप्पे खालीलप्रमाणे –

पहिला टप्पा :– ग्राम आरोग्य नोंदवहीतून खालील माहिती गोळा करा.

१) गावाची एकूण लोकसंख्या

२) गावातील एकूण घरांची संख्या

३) गावातील दारिद्रयरेषेखालील कुटुंबांची संख्या (धर्म, जात इत्यादी माहितीसह)

४) आरोग्य, पाणी, स्वच्छता व पोषण संदर्भातील सेवा घेणाऱ्या लाभार्थ्यांची किंवा लाभ घेऊ शकतील अशा व्यक्तींची यादी यात प्रामुख्याने वंचित घटकांवर अधिक भर द्यावा.

उदा. गरोदर महिला, धोक्याची लक्षणे असलेल्या गरोदर महिला, अपंग व्यक्ती, ६ वर्षाखालील मुले, कुपोषित मुले इत्यादींची यादी.

दुसरा टप्पा :– वर्षभरात घ्यावयाच्या निरनिराळया कार्यक्रमांचे वेळापत्रक तयार करा. ज्यावरुन समितीला दर महिन्याला एकेक विषय घेता येईल. हे वेळापत्रक तयार करतांना हवामान, ऋतुंचे बदल इत्यादीचा विचार करावा.

वार्षिक वेळापत्रकाचे एक उदाहरण :-

महिना	सुचविलेले विषय / कार्यक्रम
जानेवारी	
फेब्रूवारी	गोवर
मार्च	
एप्रिल	अतिसार/ जुलाबाबत जनजागृती
मे	अतिसार / जुलाबाच्या केसेसची नोंद ठेवणे
जून	मलेरियासाठी जनजागृती
जुलै	मलेरिया केसेसची नोंद ठेवणे /शाळा भरतीसाठी उपक्रम
ऑगस्ट	
सप्टेंबर	
ऑक्टोबर	
नोव्हेंबर	नवजात शिशू आरोग्य
डिसेंबर	

तक्ता क्र. १

त्रैमासिक कार्यक्रमांचा प्रस्तावित आराखडा

कालावधी	प्रस्तावित उपक्रमांची यादी
एप्रिल ते जून	• विशेष आरोग्य ग्रामसभेमध्ये उपस्थित राहून गाव समिती व अबंधित निधीच्या जमाखर्चाचे सोशल ऑडिट करण्यासाठी समितीने मदत करावी. • इतर मुद्यांबरोबर अबंधित निधिचा खर्च कशावर करायचा आहे याचे नियोजन समितीने ग्रामसभेमध्ये निश्चित करावे. • ग्रामसभेमध्ये निश्चित झालेल्या अबंधित निधीच्या नियोजनाचा फलक /फलेक्स समितीने लावावा. • समितीने अंगणवाडीला भेट द्यावी. अंगणवाडीत मिळणाऱ्या सेवांचा आढावा घ्यावा. • किशोरवयीन मुलींच्या आरोग्याबाबत कृती आराखडा तयार करावा.
जुलै ते सप्टेंबर	• समितीने गावामधील पाण्याच्या स्त्रोताच्या ठिकाणी भेट देऊन पाहणी करावी. • समितीने उपकेंद्र, प्रा.आ.केंद्र, ग्रामीण रुग्णालयाला भेट देऊन तिथे कोणत्या प्रकारच्या सेवा मिळतात याची माहिती घ्यावी. • गाव स्वच्छता मोहिमेचे आयोजन समितीने करावे. त्यामध्ये गावातील सर्व गटारे, नाल्या, पाणी साठणारी ठिकाणे श्रमदानाच्या माध्यमातून स्वच्छ करावीत.

कालावधी	प्रस्तावित उपक्रमांची यादी
ऑक्टोबर ते डिसेंबर	• गावामध्ये रक्तक्षय(ॲनिमिया),रक्तदाब, मधुमेह, महिलांच्या आजारासंदर्भात तपासणी शिबिरे समितीने आयोजित करावीत. त्यासदंर्भात संबंधित आरोग्य कर्मचारी अधिकारी तसेच स्थानिक संस्था संघटनांची मदत घेण्यात यावी. • शिबिरांमधून पुढे आलेले रुग्णांना योग्य सेवा मिळवून देण्याबाबत समितीने नियोजन व पाठपुरावा करावा. • गावातील शाळांना भेट देऊन शाळांमध्ये दिले जाणारे मध्यान्ह भोजन तपासण्यात यावी.
जानेवारी ते मार्च	• समितीने लोकांना वेगवेगळया विषयांवर जनजागृती शिबिरे आयोजित करावीत. ही शिबिरे आयोजित करण्यासाठी संबंधित आरोग्य कर्मचारी अधिकारी तसेच स्थानिक संस्था संघटनांची मदत घेण्यात यावी. या शिबिरांचे विषय रक्तक्षय व्यसनाधीनता, महिला आरोग्य संदर्भातील, मासिक पाळीमधील काळजी इत्यादी, सरकारी दवाखान्यात मिळणाऱ्या आरोग्य सेवा, पावसाळयात काय काळजी घ्यावी, मधुमेह, रक्तदाब कसा टाळावा इ. असू शकतील.

वर दिल्याप्रमाणे प्रत्येक समितीने आपला त्रैमासिक कार्यक्रम आराखडा तयार करावा त्यानुसार अंमलबजावणी करावी.

तक्ता क्र.२

ग्राम आरोग्य पोषण पाणी पुरवठा व स्वच्छता समितीच्या मासिक बैठकांच्या इतिवृत्ताचा आराखडा

गावाचे नाव– बैठकीचा दिनांक–

बैठकीचे ठिकाण–

क्र.	बैठकीच्या चर्चेचे विषय	झालेले निर्णय	अंमलबजावणीचा कालावधी	जबाबदार व्यक्ती
१				
२				

आपल्या माहितीसाठीबैठकीच्या चर्चेचे विषय खालीलप्रमाणे व इतरही असावेत–

१)वेगवेगळया उपक्रमांच्या नियोजनावर चर्चा.

२) जनजागृती कार्यक्रमांच्या नियोजनावर चर्चा.

३) अबंधित निधीचे नियोजन व गेल्या महिन्यात झालेल्या खर्चाचा आढावा.

४) अबंधित निधीच्या जमाखर्चाच्या नोंदीचा आढावा.

५) वेगवेगळया आरोग्य केंद्रांना भेटी देण्याबददलचे नियोजन.

६) आशा, एएनएम, आणि एमपीडब्ल्यू यांच्या कामाचा आढावा व काम करताना येणाऱ्या अडचणी व उपाय.

७) आरोग्य सेवा मिळण्यासंदर्भात लोकांना आलेल्या अडचणी व त्यावरील उपाय.

८) विशेष आरोग्य ग्रामसभेसंदर्भातील चर्चा.

९) सोशल ऑडीटसंदर्भातील तयारीवर चर्चा.

अध्यक्ष सही   सदस्य सचिव सही

सर्व समिती सदस्यांची सही व दिनांक

तक्ता क्र. ३

ग्राम आरोग्य पोषण पाणी पुरवठा व स्वच्छता समिती

वैद्यकिय अधिकारी यांनी अंगणवाडी सेविका यांच्या मासिक सभेत अबंधित निधीच्या खर्चाचा आढावा घेण्यासाठीचा आराखडा

गावाचे नाव–   आढावा घेतल्याचा दिनांक–

आढाव्याचे ठिकाण–

आढाव्याच्यावेळी **अंगणवाडी सेविका** अबंधित निधीच्या जामाखर्चाच्या संबंधित सर्व कागदपत्रे व रजिस्टर्स वैद्यकिय अधिकाऱ्यांसमोर सादर करावीत. सर्व रजिस्टर्स व कागदपत्रे तपासून वैद्यकिय अधिकाऱ्यांनी पुढील तक्ता भरावा.

समितीने केलेल्या खर्चाचा तपशील	खर्चाची रक्कम	निर्णय कोणी घेतला / ठराव क्रमांक	खर्चाची नोंद कशात होते (आढाव्याच्यावेळी खालील रजिस्टर्स तपासून नंतर नोंद करावी.)			
			बैठकीचे इतिवृत्त	रजिस्टर	पावती	पासबुक
१	२	३	४	५	६	७

अंगणवाडी सेविकेची सही व दिनांक   वैद्यकिय अधिकाऱ्याची सही व दिनांक